# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ / फाल्गुन ३०, १९४४ (शके)**

| | |
|---|---|
| (१) ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री<br>(२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री<br>(३) कामगार मंत्री<br>(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री<br>(५) पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री | यांचे प्रभारी विभाग |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६१**

---

### प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिक दुर्बल घटकांना घरकुल देण्याचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(१) * १७८३० श्री.अंबादास दानवे, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.प्रवीण दटके, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.एकनाथराव खडसे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्याला ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत १५,२६,०१४ घरकुले आर्थिक दुर्बल घटकांना उपलब्ध करुन देण्याचे उद्दिष्ट दिले होते, त्यापैकी १३,०९,०५९ एवढ्या घरकुलांचे उद्दिष्ट राज्य शासनाने पूर्ण केले आहे तसेच मंजूर झालेल्या हक्काच्या घरकुलांसाठी उपोषण करणारे अप्पाराव पवार यांचा बीड येथे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दारातच थंडीने गारठून मृत्यू झाल्याची घटना माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दिलेले उद्दिष्ट दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत पूर्ण न झाल्याने १ लाख १६ हजार ९५५ घरकुले अन्य राज्यात वळविण्याचा आदेश केंद्र शासनाने जारी केला असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली असून सदर आदेश येताच राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या संचालकांनी राज्यातील सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निर्देश देऊन शिल्लक घरकुलांची उद्दिष्टपूर्ती पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्याला १० हजार १४६ घरकुले बांधणीचे उद्दिष्ट देण्यात आले असून दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ अखेर जिल्ह्यात ८,२३६ घरकुलांचे उद्दिष्ट पूर्ण झाले असून केंद्र शासनाच्या आदेशानुसार सदर जिल्ह्यातील दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ अखेर पर्यंत मंजुरी न मिळालेली १,९१० घरकुले केंद्र शासनाकडून अन्य राज्यात वळविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ग्रामीण भागात घरकुलांच्या अर्जांवर विहीत मुदतीत कार्यवाही करण्यात येत नसल्यामुळे गरजू लाभार्थ्यांना घरकुलांपासून वंचित रहावे लागत असून सर्वांसाठी घर या केंद्र शासनाच्या धोरणानुसार राज्यातील तसेच सोलापूर येथील घरकुलांच्या मंजूरीसाठी मुदतवाढ देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर चौकशीच्या अनुषंगाने राज्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मंजूर झालेली घरे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ मिळण्याबाबत तसेच गरजू लाभार्थ्यांनी केलेल्या अर्जांवर विहित मुदतीत कार्यवाही न करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.
(२) केंद्र शासनाने दिनांक २७/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये, उर्वरित लाभार्थ्यांची मंजूरी दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत पूर्ण करावी, अन्यथा सदरचे उद्दिष्ट दुसऱ्या राज्यास देण्याबाबत सूचित केले होते. त्यानुषंगाने, संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण यांनी सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना शिल्लक घरकुलांची उद्दिष्टपूर्ती पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्याचे कोणतेही उद्दिष्ट इतर राज्यात वळविण्यात आलेले नाही.
(३) हे खरे नाही.
(४) प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत राज्यास १४१८०७८ इतके उद्दिष्ट प्राप्त असून त्यापैकी १४१६०२३ (९९.८%) घरकुलांना मंजूरी देण्यात आली असून उर्वरित २०५५ घरकुलांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे. तसेच सोलापूर जिल्ह्यास प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत १०१०२ इतके उद्दिष्ट असून त्यापैकी ९९१४ घरकुल लाभार्थ्यांना मंजूरी देण्यात आलेली आहे. उर्वरित १८८ लाभार्थींना मंजूरी देण्याचे काम प्रगतीत आहे.

तसेच राज्याचे कोणतेही उद्दिष्ट इतर राज्यात वळविण्यात आले नसून, राज्यातील उर्वरित २०५५ घरकुलांच्या मंजुरीची प्रक्रिया सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरढोण (ता.पनवेल, जि.रायगड) येथे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गतच्या पाणीपुरवठा योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२) * १७६८४ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरढोण (ता.पनवेल, जि.रायगड) येथे राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनेला सन २०१७ या वर्षात रुपये २ कोटी ५३ लाख ८० हजार इतक्या निधीची मंजूरी देवून काम सुरू करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या १३ कि.मी. पाईपलाईनचे काम दाखवून ४ कि.मी.चे पाईपलाईनचे काम केले असतानाही संबंधित कंत्राटदाराला संपूर्ण देयक अदा करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर योजनेचे काम पूर्ण झालेले नसतानाही सदर पाणीपुरवठा योजनेसाठी नव्याने जलजीवन मिशन योजनेंतर्गत रुपये २ कोटी ९० लाख एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राष्ट्रीय पेयजल कार्यक्रमांतर्गत मौजे शिरढोण (ता.पनवेल, जि.रायगड) येथील पाणीपुरवठा योजनेच्या रुपये २ कोटी ५३ लाख ८० हजार इतक्या निधीपैकी रुपये ७९ लाख ४८ हजार एवढ्या निधीचे काम करण्यात आले असून सदर निधीद्वारे उक्त योजनेची कोणकोणती कामे करण्यात आली आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या कंत्राटदारांवर तसेच संबंधित कामाचे देयक अदा करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत शिरढोण (ता.पनवेल जि.रायगड) येथील रुपये २,८१,०६,३५९/- किंमतीच्या नळ पाणीपुरवठा योजनेस सन २०१७ मध्ये मंजुरी देण्यात आली आहे, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सदर योजनेचे काम आहे त्या स्थितीत अंतिम करण्यात आले आहे व जल जीवन मिशन योजनेंतर्गत जुनी उपांगे गृहीत धरुन त्यांचा वापर या योजनेत करुन रक्कम रुपये २९००५६३१/- चे अंदाजपत्रक करण्यात आले आहे.
(४) राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत ग्रॅव्हिटी मेन, भूस्तर टाकी, उर्ध्ववाहिनीचे पाईप लाईनचे काम करण्यात आलेले असून त्यावर रुपये ८८,९२,८२९/- इतका खर्च झालेला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेत मनोविकार आजाराचा समावेश करण्याबाबत

**(३)** * **१७२६० श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य या शासकीय योजनेत शारिरीक आजारांवरील ९०० पेक्षा जास्त उपचार व शस्त्रक्रियांचा समावेश असला तरी उक्त योजनेंतर्गत मनोविकारांचे कोणतेही लाभ मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनोविकारांनाही विम्याचा लाभ देण्यात यावा असे सर्वोच्च न्यायालयाचे आदेश असतानाही बहुतांश खाजगी कंपन्यांकडून विम्याचा लाभ मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बहुतांश खाजगी विमा कंपन्यांकडून ग्रुप विम्याच्या आधारावर काही अंशी विम्याचा लाभ मिळत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेत मनोविकार या आजाराचा समावेश करण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेत मनोविकाराकरीता एकूण ५ उपचारांचा समावेश आहे.
(२) व (३) रुग्णांना आरोग्य विमा आणि ग्रुप विमा देणाऱ्या विमा कंपन्या ह्या IRDA (insurance regulatory and development authority) संस्थेच्या अखत्यारीत येतात. IRDA (insurance regulatory and development authority) ही संस्था केंद्र शासनाच्या अखत्यारीत येते.
(४) महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेमध्ये मनोविकाराकरीता एकूण ५ उपचारांचा समावेश केलेला आहे. राज्यातील अंगीकृत शासकीय रुग्णालयांतून या उपचारांचा लाभ या योजनेंतर्गत दिला जातो. दिनांक २३ सप्टेंबर, २०१८ पासून आजपर्यंत एकूण २०९१ रुग्णांनी या उपचाराचा लाभ घेतलेला असून दाव्यांकरीता रुपये १,०३,९९,९८७/- एवढी रक्कम विमा कंपनीद्वारे अंगीकृत रुग्णालयांना अदा केलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक पदवीधर विषय शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करणेबाबत

**(४) * १७२१२ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १५ पेक्षा जास्त जिल्हा परिषदेतील सर्व शिक्षकांना प्रशिक्षित पदवीधर शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये केवळ पदोन्नती देऊन वेतनश्रेणी देण्याबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरटीई २००९ नुसार सर्व प्राथमिक पदवीधर विषय शिक्षकांना ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२ मे, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार नुसार देय असणारी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी विषय शिक्षक वेतनश्रेणी संघर्ष समितीने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सर्व प्राथमिक पदवीधर विषय शिक्षकांना ग्रामविकास विभागाच्या दिनांक २२ मे, २००९ रोजीच्या शासन निर्णयानुसार देय असणारी वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनने कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अशी कोणतीही मागणी ग्रामविकास विभागात प्राप्त झालेली नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कर्मचारी पेन्शन योजना-१९९५ अंतर्गत कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सेवानिवृत्तीवेतनात वाढ करण्याबाबत

**(५) * १७५६४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रवीण दटके, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात कर्मचारी पेन्शन योजना, १९९५ (ईपीएस -९५) अंतर्गत मिळणारी पेन्शन वाढवून मिळण्याच्या मागणीसाठी ईपीएस- ९५ सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेसह विविध संघटनांनी नागपूर येथे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान आंदोलन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ईपीएस-९५ योजनेंतर्गत सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने दिनांक १ सप्टेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारापर्यंत सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन मिळेल परंतु त्यानंतर सेवेत लागलेल्या कर्मचाऱ्यांना सदर निवृत्ती योजनेचा लाभ मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात ईपीएस-९५ योजनेंतर्गत दिनांक १ सप्टेंबर, २०१४ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांनाही सदर योजनेचा लाभ मिळावा तसेच ईपीएस-९५ योजनेंतर्गत मिळणारे पेन्शन वाढवून मिळावे यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बाबत कर्मचारी पेन्शन योजना, १९९५ (ईपीएस-९५) ही केंद्रशासनाची स्वयंनिधी योजना आहे. कर्मचारी पेन्शन योजना, १९९५ (ईपीएस-९५) ही योजना १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत योजना असून, या योजनेबाबत राज्य शासनाकडून कोणतीही कार्यवाही केली जात नाही.

सदर योजनेबाबतचे सर्वाधिकार केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाच्या अखत्यारित असलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठन, नवी दिल्ली यांना आहेत.

सबब, सदर योजनेबाबत राज्य शासनाचा थेट संबंध येत नसून, समन्वयक म्हणून भूमिका पार पाडत असते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील महाविद्यालयातील निवासी डॉक्टरांच्या विद्यावेतनाच्या मागणीबाबत

**(६) * १७०३८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयातील निवासी डॉक्टर समान पध्दतीने काम करीत असतानाही शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि इतर महाविद्यालयांत काम करणाऱ्या निवासी डॉक्टरांना मिळणाऱ्या विद्यावेतनात तफावत असल्याची बाब दिनांक ३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि राज्यातील सर्व महाविद्यालयातील डॉक्टरांना समान विद्यावेतन अदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे आहे.

राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय पदव्युत्तर पदवी (एम.डी/एम.एस.) अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या निवासी (कनिष्ठ निवासी-१/२/३) डॉक्टरांच्या विद्यावेतनात शासन निर्णय दिनांक ०२/०९/२०२० नुसार ०१ मे, २०२० पासून प्रतिमाह रुपये १०,०००/- इतकी ठोक वाढ करण्यात आलेली असून त्यांना सुमारे रुपये ७७,०००/- प्रतिमाह या एकसमान दराने विद्यावेतन अदा करण्यात येत आहे. याप्रमाणेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयात सुद्धा विद्यावेतन लागू आहे.

तथापि, राज्यातील खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालय व पदव्युत्तर संस्थांमध्ये कार्यरत निवासी डॉक्टरांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांप्रमाणे विद्यावेतन अदा करण्यात येत नाही.

(२) व (३) भारतीय आयुर्विज्ञान परिषद, अधिसूचना दिनांक २०/१०/२००८, नियम क्र.८(२) अन्वये खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये व पदव्युत्तर संस्थांमध्ये राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत असलेल्या निवासी डॉक्टरांना लागू असलेले विद्यावेतन अदा करणे आवश्यक आहे.

सबब, संचालनालयाकडून भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या अधिसूचनेची प्रत सर्व खाजगी विनाअनुदानित वैद्यकीय महाविद्यालये व पदव्युत्तर संस्थांना उपलब्ध करुन देऊन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाप्रमाणे निवासी डॉक्टरांना विद्यावेतन लागू करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

-----------------

## गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये पवित्र पोर्टलच्या माध्यमातून निवड केलेल्या शिक्षण सेवकांना सेवेत कायम करण्याबाबत

**(७) * १७८११ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये पवित्र पोर्टलच्या माध्यमातून प्राथमिक विभागांमध्ये १७ व माध्यमिक विभागांमध्ये ४ अशा २१ शिक्षण सेवकांची निवड करून तीन वर्षांचा कालावधी होऊनही अद्याप सेवेत कायम करण्यात आले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर २१ शिक्षकांना सेवेत कायम करण्याची मागणी विविध शिक्षक संघटनांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) होय.

(३) पवित्र पोर्टल प्रणालीद्वारे माहे सप्टेंबर, २०१९ मध्ये १७ प्राथमिक शिक्षण सेवक व ४ उच्च माध्यमिक शिक्षण सेवक अशा एकूण २१ शिक्षण सेवकांची नियुक्ती करण्यात आली होती. जिल्हा परिषद, गोंदिया यांनी सदर शिक्षण सेवकांपैकी ४ उच्च माध्यमिक शिक्षण सेवकांना १३/०१/२०२३ व १७ प्राथमिक शिक्षण सेवकांना २३/०१/२०२३ रोजीच्या आदेशान्वये नियमीत केले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर प्रशिक्षण पूर्ण करुनही विद्यावेतनावर काम करीत असल्याबाबत

**(८) * १७४९७ श्री.रामदास आंबटकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा रूग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रामध्ये डाटा एन्ट्री ऑपरेटर ह्या पदांवर कंत्राटी पध्दतीने भरती करण्यात आली असून, गत तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने सदर कंत्राटी कर्मचाऱ्यांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात आरोग्य विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी डाटा एन्ट्री ऑपरेटर हे १ वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करुनही विद्यावेतनावर काम करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर ऑपरेटर यांचे राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत (नॅशनल हेल्थ मिशन) डाटा एन्ट्री सर्व्हिसेस मध्ये शासन समायोजन करणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची नेमणूक पुणे येथील यशस्वी अकॅडमी स्किल कंपनीच्या माध्यमातून करण्यात येऊन सदर कंपनीने नेमणूक दिल्यापासून एका वर्षात वेतनात २० टक्के वाढ करण्याचे आश्वासन दिले असतानाही केवळ २ ते ३ महिन्यांचेच मानधन नियमित अदा केले, हे ही खरे काय,
(५) असल्यास, राज्यातील डाटा एन्ट्री ऑपरेटर यांनी जिल्हानिहाय मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांसह जिल्हा शल्य चिकित्सकांना निवेदन देऊन वेतन अदा करावे आणि त्यांची नियुक्ती कंपनीतर्फे न करता त्यांना थेट राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सामावून घेण्याची मागणी केली आहे, हे ही खरे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सेवा शाश्वती, समान काम, समान वेतन धोरणानुसार तात्काळ वेतनश्रेणी लागू करून संपूर्ण राज्यातील जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या अखत्यारित डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना थेट राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सामावून सर्व सेवा सुविधांचा लाभ देण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, माहे सप्टेंबर, २०२२ पासूनचे प्रलंबित विद्यावेतन सर्व डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना अदा करण्यात आलेले आहे.
(२) हे खरे आहे.

ॲप्रेन्टींस ॲक्ट, १९६१ मधील तरतुदीनुसार रुपये ९०००/- प्रतिमाह प्रमाणे विद्यावेतन संबंधित एजन्सीमार्फत अदा करण्यात येते.
(३) हे खरे नाही.
(४) हे खरे नाही.
(५) हे खरे आहे.
(६) डाटा एन्ट्री ऑपरेटर यांची नियुक्ती बाहयस्त्रोत यंत्रणेमार्फत ठराविक कालावधीसाठी करण्यात आलेली असून त्यांना सेवा शाश्वती, समान काम, समान वेतन धोरणानुसार वेतनश्रेणी लागू करता येणार नाही. तसेच त्यांना राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सेवेत थेट सामावून घेता येणार नाही.

-----------------

## हाफकीन या संस्थेमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या होणाऱ्या वारंवार बदल्यांमुळे औषध खरेदी प्रक्रियेवर परिणाम होत असल्याबाबत

**(९) * १७०५४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औषध खरेदीत वारंवार होणारे घोटाळे रोखण्याबरोबरच सार्वजनिक आरोग्य, वैद्यकीय शिक्षण विभागांच्या रुग्णालयांना वेळेवर औषधे मिळावी यासाठी राज्य शासनाने औषध खरेदीची स्वतंत्र

जबाबदारी हाफकीन या संस्थेवर सोपविली असून औषध खरेदी कक्षाची निर्मिती झाल्यापासून गत तीन वर्षांत १३ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या असून व्यवस्थापकीय संचालक वारंवार बदलत असल्याने सार्वजनिक रुग्णालयांमधील औषध खरेदीसह महत्त्वाच्या प्रक्रिया वेळेवर पूर्ण होण्यास समस्या उद्भवत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तमिळनाडू मध्ये सार्वजनिक आरोग्य यंत्रणेमध्ये राबविण्यात आलेले मॉडेल आदर्श असून तेथे रुग्णालयांना औषधांची उपलब्धता किती हवी आहे याचा अंदाज वर्षाच्या सुरुवातीला दिला जातो व तिथे एका प्रशासकीय अधिकारी ऐवजी पाच जणांची समिती एकत्रितरित्या काम करत असल्याने उत्कृष्टरित्या रुग्णालयांना औषध पुरवठा करता येणे शक्य होत असून, हाफकीनला निधी उपलब्ध झाल्यानंतर औषधांची मागणी व नोंदणी ठरत असून राज्याला आवश्यक असणाऱ्या औषधांपेक्षा अतिरिक्त औषधे मागवली जात असल्याने कोट्यवधी रुपयांची औषधे मुदतबाह्य होवून फेकून देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचा अनागोंदी कारभार, हस्तक्षेप, औषधांच्या खरेदी प्रक्रियेमध्ये नसलेला पारदर्शीपणा इत्यादी बाबींच्या एकत्रित परिणामामुळे राज्यातील रुग्णांना निकृष्ट दर्जाची औषधे दिली जात असून सदर प्रक्रियेत सुधारणा होण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३) आरोग्य संस्थांना औषधे व अन्य बाबींचा पुरवठा होण्यास विलंब होऊन रुग्णसेवा विस्कळीत होऊ नये यास्तव सार्वजनिक आरोग्य विभागाने औषधे, सर्जिकल्स साहित्य व अन्य बाबींची खरेदी करण्यासाठी "महाराष्ट्र वैद्यकीय खरेदी प्राधिकरण" निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. तसेच, हाफकिन महामंडळाच्या खरेदी कक्षामार्फत सद्य:स्थितीत करण्यात येणाऱ्या औषधे व अन्य बाबींच्या खरेदीसंदर्भात मानक कार्यपध्दती (SOP) शासनामार्फत करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये रुग्णांची फसवणूक करुन किडनी काढण्यात येत असल्याबाबत

**(१०) * १७४०७ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील ससून रुग्णालयामध्ये किडनी (मुत्रपिंड रोपन) रॅकेट चालू असून त्यामध्ये रुग्णांची फसवणूक करुन व पैशांचे आमिष दाखवून रुग्णांची किडनी काढण्यात येत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किडनीची भरमसाट भावात विक्री करुन रुग्णांच्या नातेवाईकांची फसवणूक करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किडनी रॅकेटमध्ये सामील असणाऱ्या संबंधित डॉक्टर्स, कर्मचारी तसेच किडनी विक्री करुन गैरमार्गाने पैसा कमाविणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही.
(२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या शाळांना अनुदान मिळणेबाबत

**(११) * १७६२७ श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस.सी. व्होकेशनल) अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या शाळांना व शिक्षकांना अनुदान देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस.सी. व्होकेशनल) अभ्यासक्रमांचा समावेश असलेल्या शिक्षकांना अनुदान देण्याबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यासक्रमाचा समावेश असलेल्या शाळांमध्ये कोणतेही स्तरावर विज्ञान प्रदर्शनाकरीता अनुदानाची पूर्वी असलेली तरतूद बंद करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील उच्च माध्यमिक व्यवसाय (एच.एस.सी. व्होकेशनल) अभ्यासक्रम असलेल्या शाळांकडील विनाअनुदानित शिक्षकांना अनुदान मिळण्याच्यादृष्टीने तसेच विज्ञान प्रदर्शनकरीता अनुदानाची तरतूद उपलब्ध होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) केंद्र शासनाकडून उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाकरीता (एच.एस.सी. व्होकेशनल) पूर्वीचे किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम) सन १९८८-८९ ते सन १९९६-९७ या कालावधीत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रतिवर्षी वेतन खर्चाच्या ७५ टक्के अनुदान प्राप्त झाले होते. तथापि, सन १९९७-९८ पासून केंद्र शासनाने सदर योजनेतंर्गत पायाभूत व प्रशिक्षण सुविधांकरीता तसेच, वेतन खर्चाकरीता वेतन अनुदान बंद केले असून सदर योजनेचा संपूर्ण आर्थिक भार राज्य शासनावर आहे. सदर योजनेस केंद्र शासनाने अनुदान बंद केल्यामुळे सन १९९८-९९ पासून राज्य शासनाने या योजनेतंर्गत व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करू इच्छिणाऱ्या संस्थांना कायमस्वरूपी विनाअनुदानित तत्वावर मान्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असून तो अद्यापपर्यंत लागू आहे.

केंद्र शासनाच्या दिनांक २७/१२/२०१३ रोजीच्या अधिसूचनेनुसार, दिनांक २७/१२/२०१८ नंतर देशातील सर्व कौशल्य शिक्षण/प्रशिक्षण कार्यक्रम हे एन.एस.क्यू.एफ. (National Skill Qualification Framework (N.S.Q.F.) मानकाशी सुसंगत असणे अनिवार्य असून, एन.एस.क्यू.एफ. मानकाशी सुसंगत

नसणाऱ्या कोणत्याही अभ्यासक्रमाला उत्तेजन व अर्थसहाय्य न देण्याचे निर्देश सर्व राज्यांना देण्यात आलेले असून अनेक राज्यांनी सदर अभ्यासक्रम बंद केलेले आहेत. यासंदर्भात +२ स्तरावरील उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमांचे (H.S.C.Voc.) रुपांतर करण्याच्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने शासनास शिफारस करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असून, सदर समितीच्या अहवालावर कार्यवाही सुरू आहे.
(३) व (४) विज्ञान प्रदर्शन या घटकाचा एच.एस.सी. व्होकेशनल या योजनेत समावेश नसल्याने विज्ञान प्रदर्शनाकरीता अनुदानाची तरतूद करण्यात येत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळे स्थापन करण्याबाबत

**(१२) * १७७६६ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मनोरुग्णालयांमधील अनेक रुग्ण हे मानसिकदृष्टया आजारी असून अशा रुग्णांकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशा रुग्णांच्या मानसिक आरोग्याचा आढावा घेण्यासाठी सन २०१७ च्या मानसिक आरोग्यसेवा कायद्यांतर्गत मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळे स्थापन करण्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात पुनरावलोकन मंडळेच स्थापन करण्यात आली नसल्यामुळे या कायद्याची राज्यात अंमलबजावणी होताना दिसत नाही, हे ही ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मानसिक रुग्णांच्या मानसिक आरोग्याचा आढावा घेण्यासाठी मानसिक आरोग्य पुनरावलोकन मंडळे स्थापन करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

राज्यात ठाणे, पुणे, रत्नागिरी व नागपूर या ठिकाणी पूर्ण क्षमतेने प्रादेशिक मनोरुग्णालये कार्यान्वित आहेत. सध्या आंबेजोगाई जि.बीड येथे वृध्दत्व आरोग्य व मानसिक आजार केंद्र कार्यान्वित करण्यात आलेले आहे. तसेच जालना जिल्ह्यात ३६५ खाटांचे प्रादेशिक मनोरुग्णालय मंजूर करण्यात आलेले आहे. त्याचबरोबर राज्यातील ३४ जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये जिल्हा मानसिक कार्यक्रमाव्दारे मानसिक रुग्णांना आरोग्य सेवा देण्यात येते. तसेच त्यांच्यासाठी १० खाटा आरक्षित ठेवण्यात येतात.

राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मानसिक रुग्णांना आरोग्य सेवा देण्यासाठी मनशक्ती क्लिनिक सुरु करण्यात आलेले आहे.

राज्यात ठाणे, पुणे व अंबेजोगाई येथे टेलेमानस योजनेंतर्गत १४४१६ या टोल फ्री क्रमांकावर मानसिक आजारावर Tele consult सुरु करण्यात आलेले आहे. या टोल फ्री क्रमांकावर आतापर्यंत जवळपास ६००० कॉल प्राप्त झालेले आहे. तसेच या कार्यक्रमांतर्गत ५३ कंत्राटी स्वरुपाच्या समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) दिनांक १५ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार, मानसिक आरोग्य अधिनियम, २०१७ मधील खंड ७३ व ७४ नुसार पुणे, ठाणे, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, अकोला, औरंगाबाद व लातूर या आरोग्य सेवा मंडळाच्या ठिकाणी मानसिक आरोग्य आढावा मंडळाचे गठन करण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत नागपूर जिल्ह्यात अनुज्ञेय होणाऱ्या रस्त्यांच्या प्रस्तावित केलेल्या कामांना मंजुरी देण्याबाबत

**(१३) * १६९२१ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ अंतर्गत सन २०२२–२०२३ या वर्षासाठी निश्चित केलेल्या उद्देशात नागपूर जिल्ह्यात अनुज्ञेय होणाऱ्या रस्त्यांच्या एकूण देय लांबीत वाढ करणेबाबतचा प्रस्ताव मुख्य अभियंता, नागपूर यांनी ग्रामविकास विभागाला सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत निकषातील असलेले इतर ग्रामीण मार्ग व ग्रामीण मार्ग तथा तालुक्यातील भौगोलीक क्षेत्रानुसार रस्त्यांच्या लांबीचा देय भाग निकषात बसत असल्याने व या रस्त्यांचा दर्जा सुधारुन अनेक मार्ग प्रमुख जिल्हा मार्ग झालेले असल्याने अतिरिक्त लांबी मंजूर करणे आवश्यक असल्याचे प्रस्तावात नमूद केलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ग्रामीण रस्त्यांचा दर्जा सुधारावा यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचा टप्पा-२ राबविण्यात येणार आहे काय, तसेच प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेत समावेश नसलेल्या आणि दुरवस्था झालेल्या रस्त्यांचा दर्जा सुधारावा यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ च्या धर्तीवर राज्यात तसेच नागपूर जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ ही टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजनेंतर्गत नागपूर जिल्ह्यातील अनुज्ञेय होणाऱ्या रस्त्यांच्या शासन मंजूर देय लांबीत वाढ करून प्रस्तावित केलेल्या कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करून आवश्यक निधी उपलब्ध करण्याच्यादृष्टीने तसेच राज्यातील जिल्ह्यांतील गावे आणि वाड्या-वस्त्यांची जोडणी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) होय, हे खरे आहे.
राज्यात दिनांक ०६/०१/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-२ राबविण्यात येत असून, जिल्ह्यातील एकूण ग्रामीण मार्ग व इतर जिल्हा मार्ग यांच्या लांबीच्या प्रमाणात, जिल्हा निहाय उद्दीष्ट निश्चित करण्यात आले आहे. सदर उद्दीष्ट निहाय रस्ते दर्जोन्नतीची कामे हाती घेण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) येथील शासकीय रुग्णालयात महिलेला बुरशीजन्य व कमी साहित्य असलेले बेबी केअर किट देण्यात आल्याबाबत

**(१४) * १७६८१ श्री.प्रविण पोटे-पाटील :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय रुग्णालयांत अथवा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये पहिल्या प्रसुती वेळी नवजात बाळाला बेबी केयर किट देण्यात येतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेबी केअर किट योजनेत नवजात शिशुंच्या मातांना शिशु देखभाल किट प्रदान केली जात असून महिलांची प्रसुती अधिकाधिक प्रमाणात रुग्णालयात करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देश्यातून शासनाने सदर योजना आंध्र प्रदेश, तामिळनाडू व तेलंगणा राज्याच्या धर्तीवर सुरु करण्याचे प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अचलपूर (जि.अमरावती) येथील शासकीय रुग्णालयात महिलेला बुरशीजन्य व कमी साहित्य असलेले किट देण्यात आल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) हे खरे आहे.

देशातील आंध्रप्रदेश, तामिळनाडू व तेलंगणा ही राज्ये नवजात बालकांना बेबी केअर किट उपलब्ध करुन देतात. त्यानुषंगाने महाराष्ट्र राज्यात शासकीय प्राथमिक आरोग्य केंद्र /शासकीय रुग्णालयात गरोदरपणी नाव नोंदणी केलेल्या व त्याठिकाणी प्रसुती होणाऱ्या महिलांना पहिल्या प्रसुतीच्या वेळी त्यांच्या नवजात बालकासाठी (मुलगा किंवा मुलगी) शासनामार्फत बेबी केअर किट उपलब्ध करुन देण्यास शासन निर्णय दिनांक २९/१२/२०१८ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) लाभार्थ्यांच्या नातेवाईकांनी दिलेल्या तक्रारीचे अनुषंगाने या प्रकरणी एकात्मिक बालविकास सेवा योजना, अचलपूर कार्यालयाकडून चौकशी करण्यात आली. चौकशीत तथ्य आढूळन आले नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) तालुक्यातील गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात १०० खाटांची व्यवस्था व स्वतंत्र स्त्री रुग्णालय सुरु करण्याबाबत

**(१५) * १७३२३ श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) या आदिवासी तालुक्यातील रुग्णालयात स्त्रीरोग तज्ञ व इतर वैद्यकीय तज्ञांचा अभाव असून गरोदर महिलांना वैद्यकीय सेवा उपलब्ध होत नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किनवट (जि.नांदेड) येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय स्थापन करण्याची तसेच गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांचे रुग्णालयात श्रेणीवर्धन करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किनवट (जि.नांदेड) येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय व गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात गरोदर स्त्रीया तसेच सर्वसामान्य रुग्णांकरीता वैद्यकीय तज्ञ व स्त्रीरोग तज्ञांची नेमणूक करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने किनवट (जि.नांदेड) येथे स्वतंत्र स्त्री रुग्णालय व गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयाचे १०० खाटांचे श्रेणीवर्धन करुन वैद्यकीय तज्ञांची नेमणूक करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

उपजिल्हा रुग्णालय, गोकुंदा येथे शल्यचिकित्सक, भिषक, बधिरीकरणतज्ञ व बालरोगतज्ञ यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या असून स्त्रीरोगतज्ञ हे पद रिक्त आहे. नांदेड जिल्ह्यातील इतर आरोग्य संस्थांतील स्त्रीरोगतज्ञांच्या सेवा आठवड्यातून ०३ दिवस उपजिल्हा रुग्णालय, गोकुंदा येथे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) स्वतंत्र स्त्री रुग्णालय स्थापन करण्याचा प्रस्ताव आयुक्त स्तरावर प्राप्त झाला असून सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर तो निकषानुसार तपासून त्यानुसार कार्यवाही करण्यात येईल. तसेच १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या श्रेणीवर्धनाचा सुधारित प्रस्ताव मागवून कार्यवाही करण्यात येत आहे.

नांदेड जिल्ह्यातील इतर आरोग्य संस्थांतील स्त्रीरोगतज्ञांच्या सेवा आठवड्यातून ०३ दिवस उपजिल्हा रुग्णालय, गोकुंदा येथे उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. वैद्यकीय अधिकारी गट-अ (एस-२०) संवर्गाची रिक्त पदे नियमित स्वरुपात भरण्याकरीता अद्ययावत बिंदुनामावली व आकृतिबंध तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अतिदुर्गम आदिवासी भागातील आरोग्य संस्थांकरीता दिलेल्या सौरऊर्जा निर्मिती संयंत्रणाच्या देखभाल व दुरुस्ती बाबत

**(१६) * १७६२६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिदुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा पुरविणाऱ्या आरोग्य संस्थांना तसेच शैक्षणिक संस्थांना महावितरणमार्फत विद्युत पुरवठा करण्यास अनेक समस्या निर्माण होत असल्यामुळे शासनाने विविध योजनेतून सौरऊर्जा निर्मिती संयंत्र उपलब्ध करुन दिली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सौरऊर्जा निर्मिती संयंत्र पुरवठादारास यापूर्वी सदर संयंत्रांची वर्षातून एकदा देखभाल दुरुस्ती करणे बंधनकारक असताना देखभाल दुरुस्तीच्या कालावधीत ५ वर्षांची वाढ करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नंदुरबार जिल्ह्यातील अनेक आरोग्य संस्थेतील सौर ऊर्जा निर्मिती संयंत्रणेच्या देखभाल दुरुस्तीचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे आरोग्य सेवा देतांना समस्या निर्माण होत आहेत तसेच शैक्षणिक संस्थांचे विशेषतः डिजीटल शाळेला विदयुत पुरवठा बंद असल्यामुळे कोटयवधी रुपये खर्च करुन शासनाने सुरु केलेल्या डिजीटल शाळेची यंत्रणा बंद पडून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अतिदुर्गम भागातील आरोग्य संस्थेवरील व शैक्षणिक संस्थांकरीता सौरऊर्जा निर्मिती संयंत्रणेच्या मूळ पुरवठादारांकडून देखभाल दुरुस्तीचा बंधनकारक कालावधी संपल्यानंतरही विद्युत पुरवठा सुरळीत व कायम सुरु राहावा याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत अहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.
(२) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य संस्थांबाबत- राज्यातील सन २००८-२००९ मध्ये शासनामार्फत आरोग्य संस्थामध्ये बसविण्यात आलेल्या सौरऊर्जा निर्मिती संयंत्राचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी पुरवठादारास एक वर्षाकरीता बंधनकारक करण्यात आला होता. सदर एक वर्षाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर सौरऊर्जा निर्मिती संयंत्र व्यवस्थितरित्या कार्यरत राहण्याकरीता त्यांचे पुढील ५ वर्षाकरीता देखभाल दुरुस्तीचा कालावधी वाढविण्यात आला.

शैक्षणिक संस्थांबाबत- समग्र शिक्षा अंतर्गत अमरावती, गडचिरोली व नंदुरबार जिल्ह्यातील अति दुर्गम भागातील ज्या शाळांमध्ये विद्युत पुरवठा नाही अशा शाळांकरीता वार्षिक कार्य योजना व अंदाजपत्रक सन २०२१-२२ मध्ये १ ते २ KW क्षमतेचे अनुक्रमे १८, ३६ व ३३३ सौर ऊर्जा संच मंजूर करण्यासाठी रुपये ६९६.६० लक्ष तरतूद मंजूर करण्यात आली आहे. सदर प्रकल्पास तांत्रिक मान्यता घेण्याबाबतचा प्रस्ताव महाऊर्जा, पुणे या कार्यालयास सादर करण्यात आला असून त्यास अद्याप मान्यता मिळालेली नाही. यामध्ये ५ वर्ष कालावधीपर्यंत वार्षिक देखभाल करार अंर्तभूत आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

आरोग्य संस्थांबाबत- नंदुरबार जिल्ह्यातील ५० आरोग्य संस्थाना शासनामार्फत सौरऊर्जा निर्मिती संयंत्र सन २००९ ते सन २०१४ मध्ये बसविण्यात आले होते. सदर सौरऊर्जा निर्मिती संयंत्राचा देखभाल दुरुस्तीचा कालावधी सन २०१९ मध्ये संपुष्टात आलेला आहे. परंतु पुढील देखभाल दुरुस्ती करीता अनुदान उपलब्ध न झाल्याने देखभाल दुरूस्ती बाबतचा करार करण्यात आला नाही.

शैक्षणिक संस्थांबाबत- जिल्हा परिषदांच्या प्राथमिक शाळांच्या खंडीत व थकीत वीज देयकांची रक्कम अदा करण्यासाठी शासनाकडून सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षात अनुक्रमे रुपये ५.८८ कोटी व रुपये १४.८८ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यानुसार थकीत वीज देयकांची रक्कम महावितरण कार्यालयास अदा करण्यात आली आहे. तसेच,

आर्थिक वर्ष २०२२-२३ करीता राज्यातील जिल्हा परिषदांच्या थकीत वीज देयकांकरीता रुपये १८.५६ कोटी इतका निधी दिनांक ०६/०२/२०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे वितरीत करण्यात आला आहे.

(४) आरोग्य संस्थांबाबत- नंदुरबार जिल्ह्यातील आरोग्य संस्थेतील सौरऊर्जा निर्मिती संयंत्राचे श्रेणीवर्धन करण्यासाठी सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षामध्ये NHM अंतर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर सौरऊर्जा निर्मिती संयंत्राचे श्रेणीवर्धन करण्याची कार्यवाही चालू आहे.

शैक्षणिक संस्थांबाबत- समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत संयुक्त शाळा अनुदान अंतर्गत आर्थिक वर्ष २०२२-२०२३ करीता रुपये १७९.१९ कोटी निधी वितरीत करण्यात अला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरातील ससून सर्वोपचार रुग्णालयातील साफसफाईचे कंत्राट एकाच कंपनीला मंजूर केल्याबाबत

**(१७)** * **१७१५१ श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील ससून सर्वोपचार रुग्णालयामधील स्वच्छतेचा ठेका सन २०१८ पासून एकाच ठेकेदाराकडे असून माहे मे, २०२२ मध्ये निविदा प्रक्रिया राबवून “करिअर झोन” या ठेकेदार कंपनीचा ठेका मंजूर करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अन्य ठेकेदार मा.न्यायालयात गेल्यानंतर मा.न्यायालयाने ज्यांना ठेका मान्य झाला आहे त्यांना कंत्राट देऊ नका असे नमूद केले असतानाही सन २०१८ पासून डी एम एंटरप्रायझेस या काम करणाऱ्या ठेकेदाराला बेकायदेशीरपणे पुन्हा कामे दिल्याची बाब दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१८ पासून डी. एम. एंटरप्रायझेस या ठेकेदाराची मुदत नियमानुसार कधी पूर्ण होणार आहे, तसेच माहे मे, २०२२ पर्यंत त्याच ठेकेदाराला वारंवार मुदतवाढ देण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सन २०१९ ते माहे मे, २०२२ या काळात निविदा प्रक्रिया राबवून स्वच्छतेचा ठेका देण्यास विलंब करणाऱ्या संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांविरोधात शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही.

(२) नाही.

(३) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे मध्ये सन २०१८ मध्ये ई-निविदा प्रक्रिया राबवून मे. डी.एम.एंटरप्रायजेस ११ महिन्यांकरीता साफसफाई चे कंत्राट देण्यात आले होते. तसेच, २०१९ मधील लोकसभा निवडणूकीच्या आचारसंहितामुळे ई-निविदा प्रक्रिया राबविणे शक्य नव्हते. त्यानंतर कोविड-१९ आजारामुळे उद्भवलेली आपत्कालिन परिस्थितीत दिनांक ३०/०९/२०२० पर्यंत सदर सेवा पुरवठादारला तीन-तीन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. तद्नंतर सदर ठेक्यास शासन मान्यता प्राप्त होईपर्यंत अथवा ई- निविदा प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत संस्थास्तरावर पुढील अंतिम मुदत वाढ देण्यात आलेली आहे.

(४) प्रस्तुत प्रकरणी हेतु पुरस्सररित्या कोणत्याही अधिकारी/ कर्मचारी यांनी शासकीय नियमांचे उल्लंघन केल्याचे दिसून येत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील जिल्हा व ग्रामीण मार्गांची बेकायदेशीरपणे खोदकाम करणाऱ्या ठेकेदारांवर कारवाई करण्याबाबत

**(१८)** * **१७००० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील ‘जलजीवन मिशन’ अंतर्गत स्थानिक नागरिकांना पाणीपुरवठा करण्यासाठी कंत्राटदाराने विनापरवानगी बेकायदेशीरपणे जिल्हा मार्ग तसेच ग्रामीण मार्गावर आणि मार्गालगत जेसीबीने खड्डे खोदून जलवाहीन्या टाकल्या असल्याने या मार्गांची मोठ्या प्रमाणावर दूरवस्था झाली असल्याची बाब दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्त्यांच्या झालेल्या दूरवस्थेमुळे अपघात होवून जीवितहानी होऊ शकते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मोखाडा तालुक्यातील जिल्हा व ग्रामीण मार्गावर पाण्याच्या पाईपलाईनसाठी विनापरवानगी खोदकाम करणाऱ्या संबंधित ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मोखाडा तालुक्यातील ५८ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतंर्गत जलवाहिन्यांकरीता करण्यात येणाऱ्या खोदकामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयाकडून जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच राष्ट्रीय महामार्ग विभाग यांच्याकडून परवानगी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
तथापि, योजनेची कामे विहित मुदतीत पूर्ण करणे आवश्यक असल्याने जलवाहिन्यांकरीता चर खोदण्यात आलेले आहे. मात्र पाईप अंथरल्यावर चर त्वरीत बुजविण्यात येत असून रस्ते पूर्ववत करुन देण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पालघर यांच्यामार्फत संबंधित ठेकेदारास खोदकाम करण्यात आलेले रस्ते पुर्ववत करुन घेण्याबाबत नोटीस वजा सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पेण (जि. रायगड) तालुक्यातील उंबरमाळ, तांबडी, काजूचीवाडी, केळीचीवाडी व खऊसावाडी या आदिवासी वाड्यांच्या स्वतंत्र ग्रामपंचायतीच्या मागणीबाबत

**(१९)** * **१७९३१ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उंबरमाळ, तांबडी, काजूचीवाडी, केळीचीवाडी व खऊसावाडी (ता.पेण, जि.रायगड) या आदिवासी वाड्यांमध्ये सुमारे ३५०० आदिवासी बांधवांची लोकवस्ती असून यापैकी केवळ १ हजार २०० आदिवासी बांधव मतदानास पात्र आहेत, तर अनेक बांधवांना आजपर्यंत एकदाही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदान करता आलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या आदिवासी वाड्यांपासून जवळच असलेल्या बोरगाव ग्रामपंचायत व मळेघर ग्रामपंचायत या दोन्ही ग्रामपंचायतींनी या पाचही आदिवासी वाड्या आपल्या कार्यक्षेत्रात नसल्याचे सांगितले असल्याने या आदिवासी बांधवांना मतदानाचा अधिकार बजावता येत नसल्याचे दिनांक १० जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आदिवासी वाड्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात येत नसल्यामुळे कोणत्याही ग्रामपंचायतींना या आदिवासी वाड्यांकरीता विकास योजना राबविता येत नसून सदर आदिवासी बांधव रस्ता, वीज व पाणी यासारख्या मूलभूत सुविधांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर आदिवासींना ७५ वर्ष मतदानाचा हक्क बजावता आला नाही अशांना एकतर निर्वासित भारतीय म्हणून रेफ्युजी शेल्टरमध्ये ठेवावे नाहीतर त्यांना किमान स्वतंत्र ग्रामपंचायत देवून पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेसोबत जोडून घ्यावे ह्या मागण्या सदर आदिवासी वाड्यातील नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, मतदानाच्या हक्कापासून वंचित राहिलेल्या सदर पाच वाड्यातील आदिवासी बांधवांना मतदानाचा हक्क बजावाता यावा यादृष्टीने प्रशासनाने किमान स्वतंत्र ग्रामपंचायत देवून पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेसोबत जोडून घेण्याच्यादृष्टीने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

पेण तालुक्यातील उंबरमाळ, तांबडी, काजूचीवाडी, केळीचीवाडी व खऊसावाडी आदिवासी वाड्यांमध्ये सन २०११ च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्या ५६२ इतकी आहे. सदर आदिवासी वाड्या मधील नागरिकांची नावे पेण विधानसभा मतदार संघात समाविष्ट आहेत. त्यानुसार सदर मतदार लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीला मतदान करतात.

तथापि, सदर वाड्यांचा शेजारच्या बोरगाव व मळेघर या दोन्ही ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेमध्ये समावेश न झाल्यामुळे ग्रामपंचायतीच्या निवडणूकीमध्ये या ग्रामस्थांनी मतदान केलेले नाही.
(३) व (४) अंशत: खरे आहे.

सदर पाच आदिवासी वाड्यांमधील ग्रामस्थांना विविध शासकीय योजनांचा लाभ बोरगाव ग्रामपंचायतीकडून उपलब्ध करुन देण्यात येतात.
(५) सदर ५ आदिवासी वाड्यांचा समावेश सन २०२३ मध्ये बोरगाव ग्रामपंचायतीच्या प्रभाग रचनेमध्ये करण्यात आला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहाय्यक आरोग्य सेविकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(२०) * १८०६५ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील लसीकरण कार्यक्रमामध्ये अत्यंत महत्वाची भूमिका बजाविणाऱ्या ४३४ सहाय्यक आरोग्य सेविकांची कायमस्वरूपी पदे मागील तीन वर्षांपासून रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या तीन वर्षांपासून सहाय्यक आरोग्य सेविकांची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मुंबईत कोरोना व त्यानंतर गोवर संसर्गाची साथ सर्वाधिक वेगाने पसरलेल्या प्रभागांमध्ये उक्त वैद्यकीय कर्मचाऱ्यांची संख्या अत्यंत अल्प असून शहराची लोकसंख्या ज्या वेगाने वाढली आहे, त्या प्रमाणात या पदांच्या उपलब्धतेचा विचार करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मुंबई शहरात कोरोना तसेच गोवर संसर्गाचा प्रसार वेगाने होत असून लसीकरणासाठी महत्वाची भूमिका बजावणाऱ्या सहाय्यक आरोग्य सेवकांची रिक्त पदे भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत सहाय्यक आरोग्य सेविका असे पद अस्तित्वात नाही. तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रांमध्ये साह्यकारी परिचारीकांची (प्रसविका) या संवर्गाची ४२१ पदे रिक्त आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(२) कोविड प्रादुर्भावामुळे व काही प्रशासकीय कारणांमुळे सदर विलंब झाला असून, ही पदे रिक्त आहेत, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) लोकसंख्येवर आधारीत मुंबई शहर व उपनगरात राज्य शासनाच्या नागरी आरोग्य अभियानांतर्गत ४६४ सहाय्यक परिचारीका प्रसविका यांची अतिरिक्त पदे मंजूर असून, आरोग्य केंद्रामध्ये सहाय्यक परिचारीका प्रसविका यांची कंत्राटी पध्दतीने बाह्यस्त्रोत यंत्रणेद्वारे नियुक्ती करण्यात आली आहे, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) सदर साह्यकारी परिचारीकांची (प्रसविका) ४२१ रिक्त पदे भरण्याकरीता दिनांक ९ जानेवारी, २०२३ मध्ये सर्व स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीस अनुसरुन प्राप्त अर्जांची छाननी व पडताळणी सुरु आहे. तद्‌नंतर निवड झालेल्या उमेदवारांची सदर पदांवर नियुक्ती करण्यात येणार असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात औरंगाबाद जिल्ह्यासह इतर जिल्हयात बालक व बालिकांसाठी अनुरक्षणगृह स्थापन करण्याबाबत

**(२१) * १८१३३ श्री.सतिश चव्हाण, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाल न्याय (मुलाची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ व नियम २०१८ अंतर्गत काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना (बालक व बालिका) गरजेनुसार वयाच्या १८ वर्षांपर्यंत बालगृहामध्ये दाखल करण्यात येते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अधिनियमानुसार बालगृहातील बालकांना १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर बालगृहातून अनुरक्षणगृहात दाखल करण्याची तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विदर्भात मुलींसाठी हक्काचे अनुरक्षणगृह नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून विदर्भात अनुरक्षणगृह नसण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, राज्यात महाराष्ट्रासाठी केवळ नाशिक येथे मुलीचे अनुरक्षणगृह असल्याने मराठवाड्यासह इतर विभागातील बालगृहातील मुलींची १८ वर्ष पूर्ण झाल्यावर त्यांच्या वास्तव्याच्या समस्या निर्माण होतात, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, अनुरक्षणगृहाअभावी १८ वर्ष पूर्ण झाल्यावर मुलींना महिला बालकल्याण विभागाच्या इतर संस्थामध्ये (स्वाधार,राज्यगृह) दाखल करण्यात येते, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात विदर्भ, मराठवाड्यासह इतर विभागांमध्ये बालक व बालिकांसाठी अनुरक्षणगृह स्थापन करण्यासाठी कोणती कार्यवाही केली, वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) बालगृहांतून वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या मुलींची स्वाधार, उज्वला, महिला वसतिगृहे तसेच महिला राज्यगृहांमध्ये व्यवस्था करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कोविड-१९ या संसर्गजन्य रोगामुळे मृत्यू पावलेल्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वारसांना सानुग्रह अनुदान देण्याबाबत

**(२२) * १८१५१ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तिखी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील श्री.आकाश बाळासाहेब खवळे, रा.तिखी यांचे वडील ग्रामपंचायत कर्मचारी म्हणून तिखी येथे कार्यरत असताना कोरोनाची लागण होऊन त्यांचा मृत्यू दिनांक १७ एप्रिल, २०२१ रोजी झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असलेले कंत्राटी कर्मचारी/कामगार यांना दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत रुपये ५० लाखांचे विमा कवच देण्यासाठी ग्रामविकास विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(३) असल्यास, राज्य शासन केंद्र शासनाचा अभिकर्ता म्हणून काम करीत असून केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक २८ मार्च, २०२० रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने वित्त विभागाने दिनांक २९ मे, २०२० रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत कोरोनामुळे मृत्यू झालेल्या जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वारसांना सानुग्रह सहाय्य अदा करण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात आला,

(४) असल्यास, सानुग्रह अनुदान प्रस्ताव अहमदनगर येथून मंत्रालय मुंबई येथे मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अहमदनगर यांच्या स्वाक्षरीने पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने निर्गमित केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामविकास विभागाचे ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक परिचालक तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यरत असलेले कंत्राटी पध्दतीवरील ज्या अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनाचे अनुदान ग्रामविकास विभागाकडून देण्यात येते अशाच अधिकारी / कर्मचाऱ्यांना दिनांक २१ जानेवारी, २०२२ च्या पत्रान्वये दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत कर्तव्य बजावत असताना कोविड-१९ या संसर्गजन्य आजारांची लागण होऊन मृत पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना रुपये ५० लाखाचे विमा कवच / सानुग्रह सहाय्य देण्यास मंजुरी दिली आहे.
(३) राज्य सरकार केंद्र सरकारचा अभिकर्ता या नात्याने काम करीत असून केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या दिनांक २८ मार्च, २०२० रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने राज्य शासनाने (वित्त विभाग, मंत्रालय) दिनांक २९ मे, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केला, सदर शासन निर्णयान्वये कर्तव्य बजाविताना कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराची लागण होऊन कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास अशा कर्मचाऱ्यांच्या प्रस्तुत विमा कवच/ सानुग्रह सहाय्य खर्चासाठी अर्थसंकल्पीय लेखाशीर्ष संबंधित मंत्रालयीन विभागांकडून सुचित करण्याबाबत कळविण्यात आले आहे.
(४) होय, हे खरे आहे.
(५) कर्तव्य बजाविताना कोविड-१९ या संसर्गजन्य आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांस रुपये ५० लाखांची विमा कवच रक्कम अदा करण्याकरीता विभागामध्ये प्राप्त असलेल्या प्रस्तावांची तपासणी करून आवश्यक कागदपत्र उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना कळविण्यात आले आहे. सद्य:स्थितीत विभागामध्ये प्राप्त प्रस्तावांसाठी निधीची मागणी सन २०२२-२३ च्या सुधारित अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. निधी उपलब्ध होताच, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होताच कर्तव्य बजावताना कोविड-१९ या संसर्ग आजारामुळे मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांस रुपये ५० लाखांची विमा कवच रक्कम अदा करण्यात येईल.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शिक्षकांच्या बदल्या शासकीय यंत्रणेमार्फत करण्याबाबत

**(२३)** * **१८१८१ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात जिल्हा परिषदेंतर्गत प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचे सत्र सुरु असून राज्यस्तरीय बदल्या VINSYS SOFTWARE PVT LTD या खाजगी कंपनीमार्फत केल्या जात आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बदल्यांसाठी शासकीय यंत्रणा असतानाही वरील खाजगी कंपनीला प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांसाठी कोट्यवधी रुपये देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले असून सदर कंपनीशी केलेल्या आर्थिक तरतुदीचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जिल्हा परिषदेंतर्गत राज्यातील प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांसाठी शासकीय यंत्रणा उपलब्ध असतानाही खाजगी कंपनीची नेमणूक करुन मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या शासकीय खर्चाची संपूर्ण चौकशी होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) शासन निर्णय दिनांक २७/०२/२०१७ व २४/०४/२०१७ नुसार राज्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्या ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत धोरण निश्चित करण्यात आले होते. सदर धोरणानुसार यापुर्वी ऑनलाईन बदली प्रक्रिया एन.आय.सी. पुणे द्वारे करण्यात आलेली आहे. परंतु, ग्रामविकास विभागाच्या दिनांक ०७/०४/२०२१ च्या शासन निर्णयानुसार ऑनलाईन बदली प्रक्रिया राबविण्यास एन.आय.सी. पुणे यांनी असमर्थता दर्शविल्यामुळे रितसर निविदा प्रणाली राबवून जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत व आंतरजिल्हा बदल्यांबाबत न्यूनतम निविदाधारक VINSYS SOFTWARE PVT. LTD या खाजगी कंपनीला रुपये ४,९७,६६,५००/- या दराने पाच वर्षासाठी काम करण्यास मान्यता दिली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हा परिषदेच्या संगणक खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(२४) * १८१९६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून जळगाव जिल्ह्याकरीता संगणक खरेदी करण्यात आली असून या प्रकरणात मोठ्या प्रमाणात निधीचा अपव्यय झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हा परिषदेने कार्यालयीन कामकाजासाठी केलेल्या संगणक खरेदी प्रक्रियेमध्ये तसेच शासकीय अध्यादेशाच्या नियम पालनात अनियमितता झाली असून याबाबत निवेदेची फेरप्रक्रिया राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन निर्णयानुसार शासकीय कार्यालयातील खरेदीची किंमत गत वर्षाच्या खरेदीच्या तुलनेत किमान १० टक्क्यांपेक्षा जास्त असू नये, असे निर्देश असतानाही जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन विभागाकडून झालेल्या संगणक, यूपीएस आणि प्रिंटर खरेदीच्या किंमतीत गतवर्षीच्या तुलनेत २२ टक्के अधिक किमत लागली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत निधीचा दुरुपयोग झाल्याने संबंधित दोषींवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार खरेदी करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिरड, शहापूर व जवळा बाजार (ता.औंढा नागनाथ, जि. हिंगोली) या गावांसाठीच्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत सोलार पॉवर जनरेशन सिस्टीमची जोडणी करुन देण्याबाबत

**(२५) * १८२४७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरड, शहापूर व जवळा बाजार (ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली) या गावांसाठी शासनाने पाच कोटी रुपये खर्च करून पुरजळ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेतर्गत सोलर पॉवर जनरेशन सिस्टीम उभारण्यात आली हे खरे आहे काय,

(२)असल्यास, या योजनेचा लाभ दोन गावांना होणार असून २५ हजार पेक्षा जास्त लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लागू शकतो हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सोलर प्रकल्प पूर्ण होऊन देखील त्याची महावितरणने जोडणी करून घेतली नसल्याने त्यातून निर्माण होणारी वीज गेल्या एक वर्षापासून वाया जात असल्याचे निदर्शनास आले असून संबंधित ग्रामपंचायतीने थकबाकी भरलेली असून व्याज आणि दंडाची रक्कम न भरल्याने ही वीज जोडून देण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, दिनांक ९ जानेवारी २०२३ रोजी घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार ३० जून, २०२२ पर्यंतच्या थकबाकीवरील मूळ मुद्दल वगळता त्यावरील व्याज व विलंब आकार माफ करण्याबाबतची कार्यवाही महावितरण कंपनीने त्यांच्या स्तरावर करावी यास मान्यता देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एक वर्षापासून वीज जोडणी न करता त्यातून झालेले नुकसान निश्चित करून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच तात्काळ जोडणी करण्यासाठी संबंधितांना आदेश देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हे खरे नाही, पुरजळ प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेकरीता (ग्राहक क्रमांक ५३००२९००३८१० व ५३००२९००३७०) महावितरण कंपनीकडून उच्चदाब जोडणी देण्यात आलेली आहे. सदर ग्राहाकांची माहे डिसेंबर, २०२० अखेर असणारी थकबाकी समान सहा हप्त्यांमध्ये भरणेकरीता महावितरण कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयाकडून मंजूरी देण्यात आली होती. परंतू केवळ एक हप्ता भरल्याने व उर्वरित ५ हप्ते व त्या त्या महिन्याचे चालू विज देयक न भरल्याने दोन्ही वीज ग्राहकांचा वीज पुरवठा दिनांक ०१/११/२०२२ रोजी तात्पुरत्या स्वरुपात खंडीत करण्यात आला आहे.

दोन्ही ग्राहकांकडील एकूण मुद्दल रुपये २२.२३ लक्ष रकमेचा भरणा करण्यात आल्यानंतर शासन निर्णय दिनांक ०९/०१/२०२३ नुसार थकबाकी रकमेमधून व्याज व दंडाची रक्कम माफ करण्याची कार्यवाही उद्योग ऊर्जा व कामगार विभागाशी सल्लामसलत करुन करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## लांजा (जि. रत्नागिरी) तालुक्यामध्ये ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याबाबत

**(२६) * १८२८१ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) हा मुंबई- गोवा राष्ट्रीय महामार्गालगत असणारा एक मोठा आणि महत्वाचा तालुका असून वाहनांच्या वर्दळीमुळे सदर ठिकाणी अपघात होण्याचे प्रमाण अधिक असून अपघातग्रस्त रुग्णांना उपचार मिळावेत याकरीता सदर तालुक्यात ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेमार्फत रुग्णांना उपचार मिळावेत याकरीता एकही रूग्णालय उपलब्ध नसल्याने लांजा तालुक्यात महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून रूग्णालय सुरु करण्याची मागणी ग्रामस्थांकडून जिल्हा शल्यचिकित्सक, रत्नागिरी, जिल्हा, मा.सार्वजनिक आरोग्यमंत्री, मा.पालकमंत्री, रत्नागिरी आदींकडे करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, लांजा हा बहुतांश डोंगरी भागातील तालुका असल्याने सर्वच स्तरातील ग्रामस्थांना बाहेर जाऊन उपचार घेणे आर्थिकदृष्ट्या शक्य होत नाही, तसेच अनेकांना डायलेसिस सारख्या उपचार पध्दतीसाठी मोठी रक्कम मोजावी लागत असल्याने बऱ्याचवेळा आर्थिक समस्यांमुळे रूग्णांना उपचार घेणे देखील शक्य नसल्याने मृत्यूलाही सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने लांजा तालुक्यात सर्वसामान्य गोरगरीब रूग्णांना विनाविलंब महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभा मिळण्याच्यादृष्टीने ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याकरीता कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

डॉ.सुहास खानविलकर, श्री.स्वामी समर्थ जनरल हॉस्पीटल, यांनी पालकमंत्री रत्नागिरी यांना निवेदन दिले आहे.

(३) नाही.

ग्रामीण रुग्णालय, लांजा येथे ग्रामीण रुग्णालयांच्या निकषानुसार ओ.पी.डी. विभाग, प्रयोगशाळा विभाग, आयपीडी, आयसीटीसी, दंतविभाग, औषध विभाग, एनसीडी विभाग, आयबीएसके, आयुष विभाग, प्रसुती विभाग, क्षयरोग तपासणी, लसीकरण इ. सेवा उपलब्ध आहेत. डायलेसिस सेवा उपलब्ध नसल्याने आवश्यकतेनुसार रुग्णांना जिल्हा रुग्णालय रत्नागिरी येथे संदर्भित केले जाते.

(४) रत्नागिरी जिल्ह्यात एकत्रित महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत १३ अंगीकृत रुग्णालये आहेत. सदरहु रुग्णालयांपैकी ०७ रुग्णालयांमध्ये डायलेसिस सेवा उपलब्ध आहे. ०७ रुग्णालयामध्ये एकूण ४८ डायलेसिस मशीन असून ४६४३ रुग्णांवर उपचार करण्यात आलेले आहेत.

दिनांक ०८/०१/२०२१ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण रुग्णालय, लांजा येथील मुख्य इमारतीच्या बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर बांधकामाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवन नाही.

-----------------

## नागपुरच्या शासकीय रूग्णालयातील स्किन बँकेला अद्ययावत करण्याबाबत

**(२७)** * **१८३३७ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय रूग्णालयात गंभीर स्वरूपाच्या जळीत रुग्णांवर त्वचा प्रत्यारोपण (होमोग्राफ्टिंग) व इतर आवश्यक उपचार करण्यासाठी स्किन बँकेचे सन २०२१ मध्ये उद्घाटन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,उक्त स्किन बँकेत विविध रसायने, साहित्य, आवश्यक मनुष्यबळ याची पूर्तता अद्यापही केली गेली नाही. हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने नागपूर येथील शासकीय रुग्णालयातील जळीत रुग्णांवर त्वचा प्रत्यारोपण व इतर आवश्यक उपचार तातडीने करता यावे यासाठी सदर रुग्णालयातील स्किन बँकेला अद्ययावत करण्यासाठी कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) जळीत रुग्णांवर त्वचा (होमोग्राफ) प्रत्यारोपण ही प्रक्रिया जुनी झालेली असून आता नवीन बायोलॉजीकल ड्रेसिंग वापरुन रुग्णावर उपचार करण्यात येत असल्याने संस्थेत स्किन बँकेची गरज नसल्याने सुरु करण्यात आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याबाबत

**(२८) * १८४१० श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: कोल्हापूर जिल्ह्यात वैद्यकीय परवाना नसलेले डॉक्टर रुग्णांवर उपचार करीत असल्याची बाब निदर्शनास आली असून सदर प्रकरणी जर कोणी तक्रार केली तरच आरोग्य विभागाकडून दखल घेतली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ग्रामीण भागात बोगस डॉक्टरांचे प्रमाण अधिक असून त्यावर नियंत्रण ठेवण्याच्यादृष्टीने सर्व जिल्ह्यातील डॉक्टरांची एक सर्वसमावेशक यादी तयार करण्यात येणार आहे काय, त्यात आढळणाऱ्या बोगस डॉक्टरांवर तसेच त्यांच्याकडे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवरही कारवाई करण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, जिल्हास्तरीय समिती बोगस डॉक्टरांवर कारवाई करीत असून गाव, तालुका पातळीवर बोगस डॉक्टरांवर नियंत्रण ठेवण्याकरीता तालुकास्तरीय समिती कारवाई करीत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वैद्यकीय परवाना नसतानाही रुग्णांवर उपचार करणाऱ्या ग्रामीण भागातील बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे. राज्यात सन २०२२ मध्ये ९१ बोगस डॉक्टरांवर पोलीसांमार्फत कारवाई करण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्ह्यात सन २०२३ मध्ये आत्तापर्यंत ०२ बोगस डॉक्टरांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(२) नाही. तथापि, कोल्हापूर जिल्ह्यातील डॉक्टरांची एक सर्व समावेशक यादी जिल्हास्तरीय समितीमार्फत तयार करण्यात आलेली असून बोगस डॉक्टरांवर तसेच त्यांचेकडे काम करत असलेले कर्मचारी अनधिकृत अथवा आवश्यक शैक्षणिक अर्हता नसणारे असल्यास संबंधितांवर कारवाई प्रस्तावित आहे.

(३) नाही.

(४) संबंधित बोगस डॉक्टरांविरुध्द वैद्यकीय व्यवसाय अधिनियम, १९६१ मधील कलम ३३ व ३६ अंतर्गत आणि भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ४२० अन्वये कारवाई करण्यात आली असून गुन्हे दाखल केले आहेत. याबाबत पोलिसांमार्फत कारवाई सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पूर्व विदर्भात हत्तीपाय रोगाचे सर्वाधिक रुग्ण आढळून आले असल्याबाबत

**(२९) * १८५१८ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात हत्तीपायाचे सर्वाधिक २३,८२३ रूग्ण पूर्व विदर्भातील ६ जिल्हयांमध्ये असून त्यात चंद्रपूर जिल्हा पहिल्या क्रमांकावर असून, चंद्रपूर जिल्ह्यात हत्तीपायाचे १० हजार ३८० रुग्ण आढळून आल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्व विदर्भात हत्तीपाय रोगाचे रुग्ण वाढण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यात विशेषत: पूर्व विदर्भात वाढणाऱ्या हत्तीपाय रोगावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याच्यादृष्टीने आरोग्य विभागाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२) पूर्व विदर्भातील या जिल्हयांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणीसाठे व तलावाचे प्रमाण जास्त असून भात शेती व शिंगाडा शेती यांची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामध्ये डासांची मोठ्या प्रमाणावर उत्पत्ती होण्याची शक्यता आहे. तसेच या जिल्हयांमध्ये पावसाचे प्रमाण जास्त असल्याने मोठ्या प्रमाणात नाले, तलाव, गटार, डबकी या ठिकाणी पाणी साचून राहते व डासांची उत्पत्ती होत असते. मजुरीसाठी लोकांचे परराज्यात स्थलांतर मोठ्या प्रमाणात आहे. गडचिरोली जिल्ह्यात लोकांचे शेतात व जंगलात वास्तव्य मोठ्या प्रमाणात आहे.
(३) राज्यात हत्तीरोग प्रतिबंधक उपाय योजना खालीलप्रमाणे करण्यात आलेल्या आहेत. :-

- प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा रुग्णालय, उप जिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये त्याच बरोबर प्राथमिक आरोग्य केंद्रे व उप केंद्रे यांचे मार्फत हत्तीरुग्णाची नियमित तपासणी व उपचार करण्यात येतात.
- त्याच बरोबर रात्र चिकित्सालय तसेच नियंत्रण पथक कार्यरत आहेत. त्यांच्या मार्फत रात्र सर्वेक्षण करुन रक्त नमुने घेतले जातात व दूषित रुग्णांना औषधोपचार करण्यात येतात. माहे जानेवारी ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत एकूण ६५७३४२ इतके रात्र रक्त नमुने संकलीत करुन जंतुपरीक्षण केले आहे.
- हत्तीरोगाचा जंतु दर (MF Rate) हा सन २०२० मध्ये ०.७९, सन २०२१ मध्ये ०.५७ तसेच सन २०२२ मध्ये ०.५३ व माहे जानेवारी, २०२३ मध्ये ०.०८% आहे. हा जंतु दर सन २०२० पासून कमी होत असल्याचे आढळून आले आहे.
- सार्वत्रिक औषधोपचार मोहिम - सार्वत्रिक औषधोपचार मोहिमेत सन २०२० मध्ये ७५,८२,३२७ व सन २०२१ मध्ये ६१,१७,९७९ लाभार्थींना हत्तीरोग विरोधी गोळया खाऊ घालण्यात आल्या व मोहिमेची अंमलबजावणी करण्यात आली. यावर्षी सुध्दा १०, फेब्रुवारी पासून अद्याप पर्यंत २३,३३,३२१ लाभार्थ्यांना हत्तीरोग निर्मुलनाच्या गोळया खाऊ घालण्यात आल्या आहेत.
- विकृती व्यवस्थापन - हत्तीरोग रुग्णांना विकृती व्यवस्थापनासाठी (MMDP) २६०९० कीटचे वाटप करण्यात आले.
- अंडवृध्दी शस्त्रक्रीया - अंडवृध्दी रुग्णांवर मोफत अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्यात येतात. राज्यात एकूण २१०९ अंडवृध्दी शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.
- नियमित उपचार - नियमित विशेष मोहिम तपासणीत आढळून आलेल्या हत्तीरोग संक्रमीत रुग्णांची पडताळणी करुन सदर रुग्णांना वयोमानांनुसार हत्तीरोग विरोधी गोळीचा नियमित उपचार देऊन समुपदेशन करण्यात येते.

- डास नियंत्रण - डास नियंत्रणाकरीता कीटकशास्त्रीय सर्वेक्षण करुन आढळून आलेले डास अळी दूषीत कंटनेर रिकामे करणे, डास्पोत्पत्ती स्थानामध्ये गप्पी मासे सोडणे, कोरडा दिवस पाळणे, डास विरोधी क्रिम, अगरबत्ती, मॅट इ. चा वापर करुन डासांमार्फत संरक्षण करणे याबाबत आरोग्य शिक्षण देण्यात येते.
- दिर्घकालीन कीटकनाशकभारीत मच्छरदाणी वाटप सन २०२२- पूर्व विदर्भातील व हत्तीरोग संक्रमित भागात १३८६६९ दिर्घकालीन किटकनाशकभारीत डासांपासून संरक्षण करण्यासाठी मच्छरदाण्यांचे वाटप करण्यात आले आहे.
- अळीनाशक फवारणी- कार्यक्षेत्रातील हत्तीरोग संक्रमित भागात क्षेत्रिय कर्मचाऱ्यांमार्फत डासांवर नियंत्रण ठेवण्याकरीता अबेट, बिटीआय पावडर या रसायनांचा वापर करुन डासोत्पत्ती स्थानात फवारणी करण्यात येते.
- जीवशास्त्रीय उपाय योजना- गप्पी मासे सोडण्यायोग्य स्थाने उदा.बिनवापराच्या विहिरी, टाकी, कारंजे, मोठे डबके, तलाव, मोठे नाले, नवीन बांधकाम ठिकाणे इ. ठिकाणी गप्पी मासे सोडून डासांची उत्पत्ती कमी केली जाते.
- किटशशास्त्रीय सर्वेक्षण- उपलब्ध किटक समाहारकांच्या मार्फत कार्यक्षेत्रातील निवडक भागातील घरांमध्ये डास पकडून त्यांचे वर्गीकरण करणे, डासअळी घनता काढणे, डासांचे विच्छेदन करणे व डासोत्पत्ती स्थाने तपासणे इ. कार्यवाही करण्यात येते.
- पूर्व विदर्भातील (नागपूर विभाग) जिल्हयांचा सन २०२२ चा डास नियंत्रणासाठीचा अहवाल- सन २०२२ मध्ये एकूण ८०२२४ पैंकी ५६४२० डासोत्पत्ती स्थानांची पडताळणी केली. त्यापैंकी ३९६९५ डासोत्पत्ती स्थानांमध्ये गप्पी मासे सोडण्यात आले. ९२०७ डासोत्पत्ती स्थाने नष्ट करण्यात आले. १०६०१ डासोत्पत्ती स्थानांमध्ये अळीनाशक फवारणी करण्यात आली. ६७१० दूषित डासोत्पत्ती स्थानांमध्ये अबेटींग करण्यात आले. घरातील ३७५६१ दूषित कंटेनर रिकामी करण्यात आली.
- आरोग्य शिक्षण- कार्यक्षेत्रातील जनतेस विविध माध्यमांद्वारे व प्रत्यक्ष भेटीमध्ये हत्तीरोगाचे कारण, प्रसाराचे कारण, डासोत्पत्ती, औषधोपचार, प्रतिबंधकात्मक उपाय इ. बाबत आरोग्य शिक्षण दिले जाते. शालेय हत्तीरोग जागृती मोहिमेमध्ये माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांमार्फत हत्तीरोग जनजागृती मोहिम राबविण्यात येते. तसेच गणेश उत्सव व नवरात्र उत्सव यामध्ये हत्तीरोग आजाराविषयी जनजागृती करण्यात येते. पदयात्रा, ग्रामसभा, प्रभातफेरी, कार्यशाळा, प्रशिक्षण, विविध माध्यमांद्वारे प्रसिध्दी, पत्रकार परिषद, म्हणी, वृत्तपत्रे, हस्तपत्रिका, आकाशवाणी, दुरदर्शन या प्रसार माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येते. सदर जिल्यांमध्ये सन २०२२ मध्ये एकूण २२,३७,१९२ लोकांना आरोग्य शिक्षण देण्यात आले.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत

**(३०)** * **१८५३७ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील (आयटीआय) विद्यार्थ्यांना गेल्या अनेक वर्षांपासून दरमहा रुपये ४० एवढे अत्यंत तुटपुंजे विद्यावेतन देण्यात येत असून, सदरील विद्यावेतनात वाढ करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांना रुपये ४०/- वरुन रुपये ५००/- प्रमाणे विद्यावेतनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या स्तरावर सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने, सदरील विद्यावेतनात तातडीने वाढ करावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील प्रशिक्षणार्थ्यांना रुपये ४०/- वरुन रुपये ५००/- प्रमाणे विद्यावेतनात वाढ करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर मान्यतेस्तव सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडीतील इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्याने गर्भवती महिलेस रुग्णालयात दाखल करण्यास नकार दिल्याबाबत

**(३१) * १८६३१ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडीतील इंदिरा गांधी उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्याने गर्भवती महिलेस रुग्णालयात दाखल करण्यास नकार दिल्याने त्या गर्भवती महिलेची रुग्णालयाच्या आवारातच प्रसुती केल्याची घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी सदर महिलेच्या पतीने रुग्णालयातील प्रसुती विभागाविरोधात निष्काळजीपणाची तक्रार शांतीनगर पोलीस ठाण्यात नोंदविलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी आढळलेल्या संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

महिलेची रुग्णालयाच्या आवारातच प्रसुती केल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे. तथापि, भिवंडी उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचाऱ्याने गर्भवतीला रुग्णालयात दाखल करण्यास नकार दिला ही बाब खरी नाही.

(२) हे खरे नाही.

(३) सदर प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या प्राथमिक चौकशीमध्ये रुग्णालयातील अधिपरिचारीका, आया आणि सुरक्षा रक्षक यांनी कर्तव्यात कसूर केल्याचे निदर्शनास आल्याने त्यांना रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांचेशी योग्य प्रकारे समन्वय साधून रुग्ण व नातेवाईक यांच्याशी सौजन्यपूर्वक वागण्याबाबत समज देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावर सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्याबाबत

**(३२) * १८६५० श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रायगड जिल्ह्यातील मुंबई-गोवा महामार्गावर वाढत्या अपघातामुळे नागरिकांच्या मृत्यूचे आणि जखमी होण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याने महामार्गावर सुपर स्पेशालिटी रुग्णालय तसेच ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची आवश्यकता असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील रेपोली गावाजवळ कार आणि ट्रक अपघात होऊन नऊ जण जागी ठार झाले तसेच या अपघातात चार वर्षे वयाचा बालक हा गंभीर जखमी झाला होता त्याला तात्काळ उपचार न मिळाल्याने त्यानेही प्राण सोडला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने अपघातग्रस्त व्यक्तींना वेळेत उपचार मिळण्यासाठी सुपर स्पेशालिटी शासकीय रुग्णालय तसेच ट्रॉमा केअर सेंटर तातडीने उभारून तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यातील माणगांव तालुक्यातील रेपोली गावाजवळ दिनांक १९/०१/२०२३ रोजी कार आणि ट्रक अपघात होऊन नऊ जण जागी ठार झाले तसेच या अपघातात चार वर्षाचा बालक हा गंभीर जखमी झाला होता.त्याला तात्काळ उपचार करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालय, माणगांव येथे आणले होते. सदरील बालक हे अतिगंभीर जखमी असल्याने त्यावर प्रथमोपचार करुन पुढील उपचाराकरीता सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल, मुंबई येथे संदर्भीत करण्यात आले होते. सदरील बालकास पुढील उपचारार्थ घेवून जात असताना ४० कि.मी. अंतरावर त्याचा मृत्यू झाला.

(३) रायगड जिल्यात अलिबाग येथे वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या दिनांक ३१ जानेवारी, २०१२ च्या शासन निर्णयान्वये अलिबाग येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे शासकीय महाविद्यालय संलग्नित ५०० रुग्ण खाटांचे रुग्णालय सुरु करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे. माणगांव येथे १००

खाटांचे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित असून त्या ठिकाणी २० खाटांचे लेवल-३ ट्रामा केअर युनिट स्थापनेस दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तहसिलदार माणगांव यांचे दिनांक २१/०३/२०२२ रोजीच्या आदेशान्वये माणगांव येथील ट्रॉमा केअर युनिटकरीता मौजे खांदाड ता.माणगांव जि.रायगड येथील गट नं. ६८४ क्षेत्र, ०-३४-०० हे. आर. जागा प्राप्त झालेली आहे. यानुषंगाने सदर ट्रॉमा केअर युनिटच्या बांधकामाचे अंदाजपत्रक व आराखडे सादर करण्याबाबत जिल्हा शल्यचिकित्सक, रायगड यांनी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड यांना कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## विदर्भातील विशेषत: नागपूर व अकोला येथील होमिओपॅथिक आणि आयुर्वेदिक महाविद्यालयांच्या जमिनींच्या संचालकांनी केलेल्या व्यवहारांची चौकशी करण्याबाबत

**(३३)** * **१८४५८ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील विशेषत: नागपूर व अकोला येथील होमिओपॅथिक आणि आयुर्वेदिक महाविद्यालयांची संख्या मागील वीस वर्षांपासून कमी होत असून महाविद्यालयांच्या जमिनीबाबत संचालकांनी त्यांना असलेल्या अधिकाराचा गैरवापर करुन जागेचे व्यवहार करत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाविद्यालयाच्या नावावर असलेल्या जागा ह्या विद्यार्थ्यांसाठी लॅब, ग्रंथालये इत्यादी सुविधा उभारण्यासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाविद्यालयाच्या जागांबाबतचा निर्णय, विक्री परवानगी धर्मादाय आयुक्तांकडे न देण्याबाबत, विदर्भातील महाविद्यालयाच्या जागांबाबत संचालकांनी आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करुन बेकायदेशीररित्या व्यवहार केलेल्या महाविद्यालयांच्या जागांची चौकशी करण्याबाबत तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाविद्यालयाच्या जागांबाबत संचालकांनी केलेल्या व्यवहाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने संचालकांवर कारवाई करुन महाविद्यालयांच्या जागांबाबत करण्यात आलेले व्यवहार रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

नागपूर व अकोला येथील होमिओपॅथिक महाविद्यालयांची संख्या कमी झाली असून आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या कमी झालेली नाही. तसेच महाविद्यालयांच्या जमिनीबाबत संचालकांनी त्यांना असलेल्या अधिकारांचा गैरवापर करून जागेचे व्यवहार करत असल्याची तक्रार आढळून आलेली नाही.

(२) महाविद्यालयाच्या जागेत, संबंधित केंद्रिय परिषदेच्या मानकांनुसार विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

(३) नाही.

या संबंधित सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर, अमरावती व अकोला या कार्यालयात तक्रारी प्राप्त नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ए.आय.जे.सिध्दी जफ्फर शेखानी मेमोरियल व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ता.मुरुड, जि.रायगड) येथील उत्तीर्ण झालेले विद्यार्थी अप्रेंटीस प्रशिक्षणापासून वंचित असल्याबाबत

**(३४) * १६९८३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ए.आय.जे.सिध्दी जफ्फर शेखानी मेमोरियल व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ता.मुरुड, जि.रायगड) येथील उत्तीर्ण झालेले विद्यार्थी रायगड जिल्ह्यात असलेल्या कंपनीत विशिष्ट कालावधीसाठी अप्रेंटीस प्रशिक्षणापासून वंचित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडे कंपनीचा विशिष्ट कालावधीचा अनुभव नसल्यामुळे शासकीय किंवा कंपनीमध्ये नोकरी मिळण्यासाठी समस्या उद्‌भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर संस्थेतून आय.टी.आय. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना रायगड जिल्ह्यातील कंपन्यामध्ये अप्रेंटीस प्रशिक्षणाकरीता प्राधान्याने निवड होण्यासाठी कोणती उपाययोजना केली आहे, वा करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) व (२) नाही.

याबाबत कोणतीही लेखी निवेदन संबंधित संस्था, संबंधित मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्र, संबंधित प्रादेशिक कार्यालय तसेच संचालनालयास प्राप्त झालेली नाही.

(३) सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी National Apprenticeship Promotion Scheme (NAPS) व Maharashtra Apprenticeship Promotion Scheme (MAPS) अंतर्गत प्रशिक्षणार्थी व आस्थापना यांना वित्तीय सहाय्य देण्याचे प्रावधान आहे.

२. केंद्र शासनाने योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी www.apprenticeshipindia.gov.in हे वेबपोर्टल उपलब्ध करुन दिलेले आहे.

३. प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी जिल्हास्तरीय मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषंगिक सूचना केंद्राकडून PM National Apprenticeship Mela (PMNAM) आयोजन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आशा सेविकांच्या मागण्या मान्य करण्याबाबत

**(३५) * १७३१० श्री.कपिल पाटील, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १५१११ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आशा आरोग्य सेविका ह्या प्रधानमंत्री मातृ योजना, जननी शिशु सुरक्षा, (आरसीएच प्रोग्राम) आरोग्य सेवा सत्रे, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात गत १५ वर्षापासून अविरत सेवा देत असूनही त्यांना मोबदला योग्य प्रमाणात मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आरोग्य सेविकांनी परिचारीकांसाठी असलेले कोर्स पूर्ण केले असून खेडेगावात काम करीत आहेत परंतु त्यांना अद्यापही सेवेत कायम करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आशा सेविका व गटप्रवर्तकांना सुसूत्रीकरणामध्ये समाविष्ट करुन इतर आरोग्य कर्मचाऱ्यांप्रमाणे किमान समान वेतन देण्यात यावे, अशी मागणी आशा सेविकांकडून शासनाकडे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील आशा वर्कर्सना मानधनाऐवजी वेतनश्रेणी लागू करण्याबाबतची मागणी शासनाच्या विचाराधीन आहे काय, असल्यास, याबाबतचा तपशील काय आहे,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आशा वर्कर्स, सुपरवायझर्स आणि अन्य आरोग्य कर्मचारी यांना शासकीय सेवेत नियमित करणे, आरोग्य सुविधा पुरविणे, किमान समान वेतन देणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या अटी, शर्ती व सवलती लागू करणे आदि मागण्यांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

राष्ट्रीय आरोग्य अभियांनार्तंत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समायोजन करण्यासंदर्भात विभागाचे कुठलेही धोरण नाही.

(३) हे खरे आहे.

(४) केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सुचनानुसार आशांना कामावर आधारीत मोबदला या तत्वावर नियुक्त करण्यात येत असल्यामुळे वेतनश्रेणी लागू करण्यात येत नाही.

(५) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत आशा स्वयंसेविका,गट प्रवर्तक यांची नियुक्ती कामावर आधारीत मोबदला या तत्वावर करण्यात येते. तसेच अन्य आरोग्य कर्मचारी यांची नियुक्ती ११ महिन्यांकरीता कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे त्यांना शासकीय सेवेत नियमित करणे, शासकीय कर्मचाऱ्यांच्या अटी शर्ती व सवलती लागू करण्यात येत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईसह राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये अवयवदानाची व्यापक उपाययोजना करण्याबाबत

**(३६) * १७८९२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १५१८९ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सद्य:स्थितीत तीन हजारांहून अधिक रुग्ण मुत्रपिंड प्रत्यारोपणाच्या प्रतीक्षेत असल्याची बाब दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईसह राज्यातील खासगी रुग्णालयातील अवयवदानाचे प्रमाण वाढत असताना सरकारी रुग्णालयातील अवयवदानाची स्थिती उदासीन असून जे.जे. रुग्णालयात गत वर्षभरात केवळ एकाच अवयवदानाची नोंद झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जास्तीत जास्त कॅडेव्हर अवयवदान व्हावे याबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याकरीता रिजनल ऑर्गन ॲण्ड टिश्यु ऑर्गनायझेशन के.ई.एम. हॉस्पीटल, परेल तसेच राज्यातील विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्रे, मुंबई/ पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच एनजीओ यांचेमार्फत नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मधुमेह व हायपरटेंशनच्या प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने किडनी निकामी होण्याचे प्रमाण देखील वाढत असून डायलिसीसवर जाणाऱ्या रुग्णांची संख्या १५० प्रती दशलक्ष इतकी असून अनेक रुग्णांसाठी नातेवाईकांमध्ये किडनी दाता किंवा कॅडेव्हर (मेंदू मृत) ऑर्गन डोनर पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नसल्याने रुग्ण प्रतिक्षेत राहतात, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकारची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले त्यानुषंगाने 'अवयवदानाचे महत्त्व विशद करुन अनेकांनी या प्रक्रियेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पहावे यादृष्टीने' मुंबईसह राज्यातील सरकारी रुग्णालयांत अवयवदानाबाबत व्यापक चळवळ हाती घेण्याबाबत शासनाने उपाययोजना अथवा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.

(२) जे. जे. रुग्णालयात गतवर्षात एकाच अवयवदानाची नोंद झाली हे खरे आहे.

(३) जास्तीत जास्त कॅडेव्हर अवयवदान व्हावे याबाबत जनतेमध्ये जनजागृती करण्याचे काम रिजनल ऑर्गन ॲण्ड टिश्यु ऑर्गनायझेशन के.ई.एम. हॉस्पीटल, परेल, राज्यातील विभागीय प्रत्यारोपण समन्वय केंद्रे- मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर तसेच एनजीओ करतात. तसेच अवयवदानात वाढ होण्यासाठी जास्तीत जास्त रुग्णालयांना नॉन ट्रान्सप्लॉन्ट ऑगर्न रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणीकृत होण्यासाठी सदर संस्थाद्वारे प्रोत्साहित केले जाते. नॉन ट्रान्सप्लांट ऑर्गन रिट्रायव्हल सेंटर म्हणून नोंदणी करण्याचे त्यांना अधिकार नाहीत.

(४) हे खरे आहे.

(५) मानवी अवयव प्रत्यारोपण कायदा, १९९४ सुधारीत २०११ नुसार अवयवदान हे ऐच्छिक आहे. अवयवदान करणे कायद्याने बंधनकारक नसल्याने एखादया रुग्णालयामध्ये अवयवदान कमी झाले किंवा झाले नाही म्हणून चौकशी करता येत नाही. तथापि, शासकीय रुग्णालयांमध्ये अवयवदानात वाढ

होण्याच्यादृष्टीने रिजनल ऑर्गन ॲण्ड टिश्यु ट्रान्सप्लांन्ट ऑर्गनायझेशन, मुंबई यांचेमार्फत शासकीय रुग्णालयातील विभाग प्रमुखांशी बैठक घेवून कार्यशाळा आयोजित करुन सदर कार्यशाळेमध्ये ब्रेनडेड घोषित करणे व अवयवदान करणेबाबत सदर रुग्णालयातील डॉक्टरांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच शासकीय रुग्णालयातील विविध विभागांमध्ये अवयवदानाबाबत जनजागृती करण्याकरीता वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थांच्या कार्यक्रमांमध्ये पोस्टर्स प्रदर्शित केली जात आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर जिल्हा परिषदेची विकास कामे निधी अभावी प्रलंबित असल्याबाबत

**(३७) * १७७८८ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नागपूर जिल्हा परिषदेचा सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या कालावधीतील मुद्रांक शुल्क अनुदानापोटी रुपये १०१ कोटींपेक्षा अधिक निधी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागपूर जिल्हा परिषदेमार्फत अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांच्याकडे निधी देण्याची मागणी करण्यात येऊनही निधी देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निधी नागपूर जिल्हा परिषदेला न मिळाल्याने जिल्हा परिषदेची अनेक विकास कामे, शाळा व उपकेंद्रे बांधकामे व दुरुस्ती यासारखी कामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर निधी नागपूर जिल्हा परिषदेला वर्ग करुन महसूल विभागातील प्रलंबित असलेला निधी देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.
(४) सन २०२२-२३ मधील अर्थसंकल्पीत निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुटीबोरी (जि.नागपूर) येथे राज्य कामगार विमा योजनेंतर्गत २०० खाटांच्या रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याबाबत

**(३८) * १७५३५ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुटीबोरी (जि.नागपूर) येथे राज्य कामगार विमा योजनेंतर्गत (एम्प्लॉईज स्टेट इन्शुरन्स् कॉर्पोरेशन ऑफ इंडिया) २०० खाटांचे रूग्णालय मंजूर असून अद्याप रूग्णालयाचे बांधकाम सुरु झाले नसल्याचे दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने बुटीबोरी (जि.नागपूर) येथे राज्य कामगार विमा योजनेंतर्गत सदर रूग्णालयाचे बांधकाम सुरु करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे अंशत: खरे आहे.

बुटीबोरी (जि.नागपूर) येथे राज्य कामगार विमा महामंडळ, श्रम मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्यामार्फत राज्य कामगार विमा योजनेंतर्गत २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येत आहे. राज्य कामगार विमा महामंडळाने विविध विभागांकडून ना-हरकत प्रमाणपत्रे (NOC) प्राप्त करण्याची कार्यवाही करुन सदर रुग्णालयाचे बांधकाम दिनांक १४/१२/२०२२ पासून सुरु करण्यात आले आहे.
(२) सदर रुग्णालयाच्या बांधकामा संदर्भात विविध विभागांकडून प्राप्त करावयाची “ना-हरकत प्रमाणपत्रे” व आवश्यक ती मान्यता प्राप्त करुन सदर रुग्णालयाचे बांधकाम सुरु करण्यात आले असल्याने कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या अनाथ मुलामुलींना शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये आरक्षण देण्याबाबत

**(३९) * १७७७० डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १८ वर्षे पूर्ण झालेल्या अनाथ मुलांना अनाथगृहे, शासकीय वसतिगृहात राहता येत नाही, त्यामुळे दरवर्षी सुमारे ३ हजार मुले बेघर होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बेघर मुले अनाथगृहातून बाहेर पडल्यानंतर त्यांना घरासाठी अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून शासनाने निर्णय घेऊन या मुलांना म्हाडा, सिडको वा अन्य शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये त्यांनी केलेल्या मागणीनुसार एक टक्के आरक्षण देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासनाने निर्णय घेऊन या मुलांना म्हाडा, सिडको वा अन्य शासकीय गृहनिर्माण योजनांमध्ये सदर बेघर मुलांना सामावून घेण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

महिला व बालविकास विभागामार्फत नाशिक येथे मुलींचे तर पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद व अमरावती येथे मुलांचे शासकीय अनुरक्षण तसेच मुंबई येथे मुलांचे स्वयंसेवी अनुरक्षण गृह अशी एकूण ७ अनुरक्षण गृहे कार्यान्वित असून या अनुरक्षण गृहांमध्ये वयाची १८ वर्ष पूर्ण झाल्यानंतर अनाथ मुलांना वयाच्या २१ वर्षापर्यंत राहण्याची व्यवस्था शासनामार्फत करण्यात येते.

(२) व (३) म्हाडा सदनिकांमध्ये १ टक्का समांतर आरक्षण देण्याच्या अनुषंगाने गृहनिर्माण विभागाकडून कार्यवाही सुरु आहे.

(४)प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील इलेक्ट्रोहोमिओपॅथींना मान्यता मिळण्याबाबत

**(४०) * १६९६८ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे ३०,००० इलेक्ट्रोहोमिओपॅथी आपला व्यवसाय केंद्र व राज्य शासनाच्या आदेशानुसार तथा मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार अटी व शर्तीच्या आधारावर अनेक वर्षांपासून करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.सर्वोच्च न्यायालयाचे तसेच शासन आदेश असतानाही स्थानिक जिल्हा प्रशासनाद्वारे या व्यावसायिकांवर वारंवार गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, इलेक्ट्रोहोमिओपॅथी व्यावसायिकांच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्याच्यादृष्टीने शासनाने दिनांक १ जुन, २०२२ रोजी वा त्यासुमारास तज्ञ समिती गठीत केली असून सदर महाराष्ट्र राज्य इलिक्ट्रोहोमिओपॅथी चिकित्सक समितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयांचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, इलेक्ट्रोहोमिओपॅथीच्या औषधांना मान्यता मिळाल्यास अल्प दरातील उपचार (हार्बल) रुग्णांना मिळणार आहेत काय, तसेच त्यासंदर्भातील सर्व पडताळणी, सर्व निर्णय सदर तज्ञ समितीने विभागाला कळविले आहेत काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने इलेक्ट्रोहोमिओपॅथीला औषधाची प्रणाली म्हणून मान्यता मिळून राज्यातील इलिक्ट्रोहोमिओपॅथी व्यावसायिकांना न्याय मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.

(२) नाही.

(३) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाने दिनांक १ जून, २०२२ रोजी राज्यातील इलेक्ट्रोहोमिओपॅथी व्यावसायिकांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी समिती गठीत केली असून समितीची कार्यवाही सुरू आहे.

(४) नाही.

(५) नाही.

केंद्र शासनाची इलेक्ट्रोहोमिओपॅथीला चिकित्सा पध्दती म्हणून मान्यता नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिरोली खुर्दे (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील नळ पाणीपुरवठा योजनेतील निधीचा अपहार केल्याबाबत

**(४१) * १८०२६ श्री.आमश्या पाडवी :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिरोली खुर्दे (ता.जुन्नर, जि.पुणे) येथील नळ पाणीपुरवठा योजना अपूर्ण ठेवून शासकीय निधीचा अपहार केल्याप्रकरणी चौकशी करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांनी सचिवांना दिलेल्या सुचनेनुसार गटविकास अधिकारी, पंचायत समिती, जुन्नर यांनी कार्यकारी अभियंता (न.पा.पु.) जिल्हा परिषद, पुणे यांना दिनांक २३ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास चौकशी अहवाल सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त चौकशी अहवालात सदर नळ पाणीपुरवठा योजना गैरव्यवहाराप्रकरणी संबंधित ठेकेदार, सरपंच आणि संबंधित अधिकारी यांनी संगनमताने योजना अपूर्णावस्थेत ठेऊन शासकीय निधीचा अपहार केल्याचे नमूद करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासकीय निधीचा अपहार करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधींनी मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्याकडे दिनांक १० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे केलेली असताना अद्यापपर्यंत सदर प्रकरणी कोणतीही निर्णयात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने शासकीय निधीचा अपहार करणाऱ्या संबंधित ठेकेदार, तत्कालीन सरपंच व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१), (२) व (३) हे खरे आहे.

(४) जिल्हा परिषद, पुणे यांचे दिनांक २५/०३/२०२१ च्या आदेशान्वये सदर योजनेची चौकशी उप अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा, जुन्नर यांचेमार्फत करण्यात आली. सदर चौकशी अहवालानुसार तत्कालीन संबंधित ग्रामसेवक/समिती अध्यक्ष यांनी रोखीने काढलेली एकूण रक्कम रुपये १,४४,८५०/- त्यांचेकडून वसुल करण्यात येवून चलनाद्वारे भरणा केलेली आहे. सद्य:स्थितीत, जुन्या टाकीवरुन गावठाणास पाणीपुरवठा चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये तसेच महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रांमध्ये शववाहिका उपलब्ध करून देण्याबाबत

**(४२) * १७९४० श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दुर्गम भागातील नागरिकांना शववाहिके अभावी मृतदेह दुचाकीसह अन्य वाहनांवरून घरी न्यावे लागत असल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक जिल्हा रुग्णालयात तसेच महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात शववाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत शासन लवकरच निर्णय घेईल, असे मा.सार्वजनिक आरोग्य मंत्री महोदयांनी दिनांक ६ मार्च, २०२२ रोजी आश्वासन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने राज्यातील प्रत्येक जिल्हा रुग्णालयात तसेच महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात शववाहिका उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) अंशत: खरे आहे.

तत्कालीन मा.आरोग्य मंत्री यांनी शववाहिनी ही स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या अखत्यारितील विषय असल्याने प्रत्येक नगरपालिकेच्या क्षेत्रात शववाहिनी उपलब्ध करुन देण्याबाबत आश्वासन दिले, ही बाब खरी आहे.

रुग्णवाहिका ही शववाहिनी नाही. रुग्णवाहिकेचा वापर रुग्ण वाहून नेण्यासाठी केला जातो. तसेच शववाहिकेची जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेकडे असते. महानगरपालिका व नगरपालिका यांनी स्वत : ची शववाहिका ठेवली पाहिजे व ती त्यांची जबाबदारी आहे. ज्या ठिकाणी शववाहिनी नसेल तेथे जिल्हा नियोजन व विकास समितीच्या माध्यमातून खरेदी केली जाईल, असे मा.मंत्री महोदयांनी आश्वासित केले होते. यामध्ये जिल्हा रुग्णालयात शववाहिनी उपलब्ध करुन देण्याबाबत मा.मंत्री महोदयांमार्फत आश्वासित करण्यात आलेले नाही.

(२) मृत शरीराचे वहन करणे ही बाब स्थानिक स्वराज्य संस्था यांचे अखत्यारीतील आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील भूमिहीनांना पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुले उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४३) * १७९३३ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंतप्रधान आवास योजनेंतर्गत केंद्र शासनाने ग्रामीण भागातील २.९५ कोटी नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मूलभूत सुविधांसह घरे बांधून देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले असून माहे मार्च, २०२४ पर्यंत उद्दिष्ट गाठण्याची मुदत ठरविण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेच्या निकषानुसार ज्या लाभार्थ्यांच्या नावावर जमीन नाही अशा भूमिहीनांना जमीन उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित शासनावर असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या योजनेंतर्गत राज्यात एक लाखांहून अधिक भूमीहीन घरकुलांसाठी पात्र असताना त्यांना घरकुले दिली जात नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने त्याबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने एक लाखांहून अधिक भूमिहीन घरकुलासाठी पात्र असलेल्यांना घरकुले देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.

राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत एकूण १२९७०५ भूमिहीन लाभार्थ्यांपैकी ६८२५५ लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऊर्वरित ६१४५० लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) राज्यात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्यासाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही सुरु आहे :-

१. पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेंतर्गत ५०० चौ.फु. पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी रुपये ५०,०००/- पर्यंत अर्थसहाय्य देणे.
२. दिनांक ०१/०१/२०११ पूर्वीची निवासी जागेवरील अतिक्रमण नियमानुकूल करणे.
३. शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करुन देणे.
४. इतर मार्गाने (भाडेपट्टा, बक्षिसपत्र इत्यादि) जागा उपलब्ध करुन देणे. तसेच, अमृत महा आवास अभियानांतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे हा उपक्रम अग्रक्रमावर आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाड (जि.रायगड) येथील मल्लक स्पेशालिटी प्रा.लि. कंपनीतील प्लांटला लागलेल्या आगीची चौकशी करण्याबाबत

**(४४)** * **१८४४३ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाड (जि.रायगड) येथील औद्योगिक वसाहतीतील (एम.आय.डी.सी) मल्लक स्पेशालिटी प्रा. लि. कंपनीतील इथिलीन ऑक्साइड प्लान्टला माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात भीषण आग लागून स्फोट झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आगीमुळे मल्लक स्पेशालिटी प्रा.लि. या कंपनीचे मोठे नुकसान झाले असून तर आग कशामुळे लागली तसेच सदर आगीमध्ये झालेल्या वित्त हानी, मनुष्य हानी यांची अधिकृत माहिती कंपनी प्रशासनाकडून देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर आगीत किती कामगार मृत्यू पावले तसेच जखमी कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याच्यादृष्टीने तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुरेश (भाऊ) खाडे :** (१), (२) व (३) बाबत,

मे. मल्लक स्पेशालिटी प्रा. लि., ता.महाड, जि.रायगड या कारखान्यात दिनांक ०८/०२/२०२३ रोजी इथिलिन ऑक्साईड/ प्रोपॅलीन ऑक्साईड प्लान्टच्या रिॲक्टरमध्ये दाब वाढल्यामुळे प्लान्टमधील रसायनांची गळती झाली व त्यामुळे आग लागून त्या प्लान्टमधल्या रिॲक्टरचा स्फोट झाला आहे.

या दुर्घटनेमुळे सदर कारखान्यातील अंदाजे २९ कोटी आणि शेजारील ३ कारखान्यांतील एकूण अंदाजे रुपये ३७ लाख रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान झाले आहे.

तसेच, कारखान्याजवळील टेमघर गावात काही प्रमाणात हादरे बसल्याने गावातील ४ घरांचे, ८ वर्कशॉपचे आणि जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडी यांचे नुकसान झाले असल्याचे कारखाना व्यवस्थापनाने कळविले आहे. त्यानुसार, तहसिलदार, महाड यांनी दिनांक १६/०२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये झालेल्या नुकसानीबाबत आर्थिक मदत देण्यासाठी मल्लक कारखाना व्यवस्थापनास कळविले होते. त्यानुसार, कारखाना व्यवस्थापनामार्फत नुकसान भरपाई म्हणून रुपये ३,९४,९००/- इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे.

सदर कारखान्यातील आगीच्या दुर्घटनेची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आली आहे. चौकशीदरम्यान घटनेच्या दिवशी कारखान्यात सुरक्षित कामाची पध्दत न अवलंबल्याचे तसेच कारखान्याच्या उत्पादन प्रक्रियेजवळ मोठ्या प्रमाणात ज्वलनशील रसायनांचा साठा केला असल्याचे आढळून आले आहे.

सदर आगीच्या दुर्घटनेत जीवितहानी झालेली नाही. तथापि, सदर कारखान्यातील ४ व शेजारच्या ३ कारखान्यांमधील ९ कामगारांना किरकोळ जखमा झाल्या होत्या. या जखमी कामगारांच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च कारखाना व्यवस्थापनामार्फत करण्यात आला असून, त्यांना वैद्यकीय उपचारानंतर त्याचदिवशी घरी सोडण्यात आले आहे.

भविष्यात अशाप्रकारच्या अपघातांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता कारखाना व्यवस्थापनास विविध उपाययोजना सुचविण्यात आलेल्या असून, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत त्याबाबत पुर्तता करुन घेण्यात येत आहे.

क्षेत्रिय कामगार अधिकारी यांनी कारखान्याचे मुख्य व्यवस्थापन तसेच कंत्राटदार यांना विविध कामगार कायद्यांतर्गत निरीक्षण शेरे पारित केले असून, मुख्य व्यवस्थापन तसेच कंत्राटदार यांना कारणे दाखवा नोटिसा बजावण्यात आल्या आहेत.

तसेच, कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द कारखाना अधिनियम, १९४८ व महाराष्ट्र कारखाने अधिनियम, १९६३ च्या तरतुदींच्या भंगाबाबत खटले दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महिला व शिशू रुग्णालयाच्या जालना रोड (जि.औरंगाबाद) येथील इमारतीच्या बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) * १८१३४ श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व शिशू रुग्णालय, जालना रोड (जि.औरंगाबाद) येथील दुध डेअरीच्या जागेवर रुग्णालयाची ६ मजली इमारत बांधण्यासाठी दिनांक २० सप्टेंबर २०१९ रोजी रुपये १११.८९ कोटी रुपयांच्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली असून प्रत्यक्ष निविदा रुपये ८९.८३ कोटींची मंजूर झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुध डेअरीच्या साडेपाच एकर जागेवर १९२७२ चौ.मि.क्षेत्रात सदर रुग्णालयाच्या इमारतीचे सुरु असलेले बांधकाम निधीअभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रुग्णालयाचे २० महिन्यात केवळ ३७ टक्के काम झाले असून निधीअभावी रुग्णालयाचे काम अपूर्ण असून सदर रुग्णालयासाठी मनुष्यबळ, वैद्यकीय मशिनरीची अद्याप तरतूद केली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने रुग्णालयाचे काम पूर्ण करण्यासाठी निधीची तरतुद करणे, पदनिर्मिती करणे व वैद्यकीय मशिनरी खरेदी करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) सदर रुग्णालयाचे ५८ टक्के बांधकाम पूर्ण झालेले असून उर्वरित बांधकाम प्रगतीपथावर आहे. हे खरे आहे.

(४) सदर रुग्णालयाचे बांधकाम ७५ टक्के पूर्ण झाल्यानंतर पदनिर्मितीचा पस्ताव शासनास सादर करण्यात येत असून इमारत बांधकाम पूर्ण होताच साहित्य सामुग्री व यंत्रसामुग्री खरेदीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ससुन सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील न्यायवैद्यकशास्त्र विभागाच्या प्रमुखांविरुध्द रुग्णालय प्रशासनाने केलेल्या तक्रारींबाबत

**(४६) * १८६१४ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथील न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख यांचेविरुध्द तेथील काम करणाऱ्या डॉक्टरांनी तसेच अनेक नागरिकांनी त्यांच्याकडे होणाऱ्या पैशांच्या मागणीबाबत व मानसिक छळाबाबत गंभीर स्वरुपाच्या तक्रारी केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी प्रकरणी नेमण्यात आलेल्या समितीने ससून सर्वोपचार रुग्णालय, येथील न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख यांना कार्यप्रणाली सुधारण्यासाठी काही निष्कर्ष व अभिप्राय सुचविलेले असून त्याची अंमलबजावणी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, पुणे येथील पोलीस उपायुक्त (गुन्हे) व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंढवा ह्या वरिष्ठ पोलीस अधिकारी यांना मृतांचा दाखला देण्यासाठी रुग्णालयाकडून वारंवार होणाऱ्या पैशांच्या मागणीबाबत तक्रार दिली असून सदर तक्रारीच्या अनुषंगाने न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख यांची बदली अथवा विभागप्रमुख पदावरुन दूर करण्यात आलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, ससून रुग्णालयातील न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख यांना वैद्यकीय शिक्षण विभागाचे संचालक मदत करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर प्रकरणी जबाबदार असलेल्या दोषींवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) सदर प्रकरणी संस्थास्तरावर गठीत चौकशी समितीमार्फत सुचविण्यात आलेले निष्कर्ष व अभिप्राय याप्रमाणे उचित कार्यवाही करण्यात आली आहे.
(३) नाही.
(४) नाही.
(५) सदर तक्रारींच्या अनुषंगाने संचालनालय स्तरावर दिनांक ०७/०६/२०२२ च्या आदेशान्वये त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा व मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी केलेल्या चौकशीमध्ये सदर तक्रारीत कोणतेही तथ्य नसल्याचे निष्कर्ष दिले आहे.

-----------------

## श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचार करण्याबाबत

**(४७)** * **१८१९९ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेंतर्गत मोफत शस्त्रक्रिया करणे बंधनकारक असतानाही रुग्णांकडून विशिष्ठ रक्कम आकारुन उपचार दिले जात असल्याची तक्रार रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी यांचेकडे केल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, धुळे येथे महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत शासकीय आरोग्यसेवेच्या माध्यमातून रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया करण्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) व (२). रुग्ण अथवा रुग्णांच्या नातेवाईकांकडून लेखी तक्रार प्राप्त झाली नाही. मात्र, दिनांक २८ व २९ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या विविध वृतपत्रांमध्ये अशा स्वरुपाच्या बातम्या प्रसिध्द झाल्या होत्या. त्यानुषंगाने, संस्थास्तरावर चौकशी समिती स्थापन केली होती. सदर चौकशी समितीने बातमी/तक्रारी मध्ये कोणते ही तथ्य नसल्याचा निष्कर्ष नोदंविला आहे.

तसेच, सदर योजनेच्या प्रभावी अमंलबजावणीकरीता संस्थास्तरावर नोडल ऑफीसर नियुक्त करण्यात आले असून योजनेची प्रभावी अमंलबजावणी होण्याकरीता रुग्णालय प्रशासनमार्फत आवश्यक त्या सूचना व उपाययोजना वेळोवेळी करण्यात येतात.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात बॅचलर ऑफ प्रोस्थेटिक्स-ऑर्थोटिक्स या अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत

**(४८) * १८३३८ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात कृत्रिम अवयव बनविण्याचे प्रशिक्षण देणाऱ्या बॅचलर ऑफ प्रोस्थेटिक्स-ऑर्थोटिक्स या अभ्यासक्रमाला केंद्र शासनाच्या अखत्यारितील रिहॅबिलीटेशन कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार रिहॅबिलीटेशन कौन्सिल ऑफ इंडिया या संस्थेकडे तसेच नाशिक येथील आरोग्य विभागाकडे परवानगीकरीता रुपये ३,०२,३०० एवढया रकमेचा भरणा करणे गरजेचे होते, परंतु सदर रक्कम स्थानिक मेडीकल प्रशासनाने न भरल्यामुळे बॅचलर ऑफ प्रोस्थेटिक्स-ऑर्थोटिक्स हा अभ्यासक्रम केवळ कागदावरच राहिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील विशेषत: विदर्भातील वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने सदर प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कारवाई होण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) हे खरे नाही.

(२) सन २००६ मध्ये सदर संस्थेस शासनामार्फत आवश्यकता प्रमाणपत्र देण्यात आले होते. तथापि, रिहॅबिलीटेशन कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्याकडे महाविद्यालय प्रशासनाने विहीत कालावधीत अर्ज व आवश्यक शुल्क भरले नसल्याने सदर अभ्यासक्रम सुरु होऊ शकलेला नाही.

(३) हे खरे नाही.

सदर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता प्राप्त झालेली नसल्याने विद्यार्थी प्रवेशित करण्यात आलेले नाहीत.

(४) सन २०२२-२३ मध्ये सदर अभ्यासक्रम राबविणाऱ्या मुंबई येथील एकमेव संस्थेत राज्यस्तरीय कोट्याच्या आठ जागांपैकी सहा जागा रिक्त आहेत.

नागपूर येथील प्रकरण हे सन २००६-०७ मधील असून सद्य:स्थितीत लागू असणारे निकष व विद्यार्थ्यांची सदर अभ्यासक्रमाप्रती असलेली उदासीनता लक्षात घेता, याबाबतचा प्रस्ताव नव्याने सादर करण्यात आलेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात औषधे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४९) * १८५२४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

((१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण शासकीय रुग्णालयात अनेक प्रकारची औषधे उपलब्ध नसल्याचे माहे जाने, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील सर्वसामान्य जनतेला खाजगी उपचार घेता येणे आर्थिकदृष्ट्या शक्य नसून शहरातील नागरिक हे घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण शासकीय रुग्णालयात जिल्हा पातळीवरुन औषध साठा उपलब्ध न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील नागरिकांना हक्काचा औषधसाठा मिळावा याकरीता जिल्हा परिषद, चंद्रपूर येथील मुख्य कार्यकारी अधिकारी याना निवेदनाद्वारे औषधे तातडीने उपलब्ध करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथील ग्रामीण शासकीय रुग्णालयात तातडीने औषध साठा उपलब्ध होण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथे अद्याप ग्रामीण रुग्णालय सुरु झालेले नाही.

सद्यःस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रच कार्यान्वित आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथे आवश्यक असलेली औषधे व साहित्य सामुग्री पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत.

(४) होय, हे खरे आहे.

(५) जिल्हा स्तरावरुन जीवरक्षक औषधांचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत चिकित्सा व आयुर्वेद महाविद्यालयांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(५०) * १८५३८ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, दंत चिकित्सा महाविद्यालयात माहे फेब्रुवारी, २०२३ अखेर अधिष्ठाता, शिक्षक, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांची एकूण मंजूर पदे किती आहेत, त्यापैकी रिक्त पदे किती आहेत, त्यापैकी सदर रिक्त पदे भरण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली आहे,

(२) असल्यास, सदरील पदे रिक्त असल्यामुळे उस्मानाबाद तसेच इतर आयुर्वेद महाविद्यालयात शैक्षणिक वर्षापासून केंद्रिय परिषदेने विद्यार्थी प्रवेशबंदी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) अ) वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय / दंत महाविद्यालय व रुग्णालयांतील अधिष्ठाता तसेच अध्यापकीय संवर्गात एकूण मंजूर ३९३४ पदांपैकी ११८३ पदे रिक्त आहेत. तसेच गट-क मधील २०९४० पदांपैकी ७८११ व गट-ड मधील ९५४३ पदांपैकी ३९७४ पदे रिक्त आहेत.

ब) आयुष संचालनालयांतर्गत शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील अधिष्ठाता तसेच अध्यापकीय संवर्गात एकूण मंजूर ३३१ पदांपैकी १५७ पदे रिक्त आहेत. तसेच गट-क मधील ९११ पदांपैकी ५१३ व गट-ड मधील ६४१ पदांपैकी २०५ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

भारतीय चिकित्सा पध्दती राष्ट्रीय आयोयाने आयुष संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या पाच शासकीय आयुर्वेद महाविद्यालयांना सन २०२२-२३ करीता पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यार्थी प्रवेशास काही त्रुटींच्या कारणास्तव प्रथमत: मान्यता नाकारली होती. तद्नंतर या त्रुटींची पुर्तता करण्याबाबत हमीपत्र दिल्यानंतर आयोगाने विद्यार्थी प्रवेशास मान्यता प्रदान केली आहे.

(३) व (४) शासकीय आयुर्वेद महाविद्यालयातील सरळसेवेने भरावयाच्या अध्यापक संवर्गातील पदांचे आरक्षण निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. ही पदे नियमितरित्या भरेपर्यंत विद्यार्थी हीत व रुग्णहीत विचारात घेऊन कंत्राटी तत्वावर भरण्यात आली आहेत. तसेच गट-क व गट-ड ची पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## राज्यात बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत

**(५१) * १८६९७ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १५१६८ ला दिनांक २६ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास अपघातग्रस्त रुग्णाला त्वरित उपचार मिळण्याकरीता बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेंतर्गत ७२ तास मोफत औषधोपचार मिळण्यासाठी तत्कालीन सरकारने घेतलेल्या निर्णयाची अंमलबाजवणी अद्याप करण्यात आली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी झाल्यास अपघातग्रस्त रुग्णांना खर्चासाठी रुपये ३० हजारपर्यंत मोफत उपचार देण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० च्या शासन निर्णयानुसार सदर योजना विमा कंपनीमार्फत राबविण्याबाबत मंजुरी देण्यात आली होती. तथापि, ही योजना हमी तत्वावर राबविल्यास शासकीय निधीची बचत होईल हे लक्षात घेऊन अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील विमा कंपनी निवड समितीच्या दिनांक १२ मार्च, २०२१ च्या बैठकीमध्ये योजना हमी तत्वावर राबवण्याची शिफारस करण्यात आली. दरम्यानच्या कालावधीत महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध व्यापक सुधारणा मुख्य कार्यकारी अधिकारी,राज्य आरोग्य हमी सोसायटी यांनी प्रस्तावीत केल्या आहेत. स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजना राबविण्याबाबत दिनांक १४ ऑक्टोबर, २०२० रोजी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेल्या अपघाता संदर्भातच्या सर्व उपचारांचा समावेश महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमध्येच करण्याचे प्रस्तावीत आहे.

-----------------

## राज्यातील परिचारिकांची बोगस पध्दतीने नोंदणी करण्यात आल्याबाबत

**(५२)** * **१८३५२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलने नोंदणीकृत केलेल्या नर्सेसच्या कागदपत्रांची तपासणी न करता सुमारे ३७,००० बोगस नर्सेसची नोंदणी करण्यात आली असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कागदपत्राशिवाय नोंदणी झालेल्या नर्सेस या राज्यासह देशभरात आणि परदेशातही नोकरी करत आहेत याबाबत राज्य सरकारला एक गोपनीय अहवाल सादर करण्यात आला असून पोलिसांकडे तक्रारही दाखल करण्यात आली असून दाखल करण्यात आलेल्या तक्रारीनुसार या नर्सेसच्या पदविका उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, गुणपत्रिका आदी कशाचीही पडताळणी न करता, महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलच्या कार्यालयातून १२०० हून अधिक परिचारिका नोंदणी प्रमाणपत्रके गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र परिचर्या परिषदेतील अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली असून सदर समितीकडून सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरोधात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही.
(२) नाही.
(३) सहसंचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र परिचर्या परिषदेने कोविड-१९ या साथरोग काळात परिचर्या प्रशिक्षण घेऊन उत्तीर्ण झालेल्या २१,०६५ विद्यार्थ्यांची नोंदणी करताना गुणपत्रिका व उत्तीर्ण प्रमाणपत्र उपलब्ध नसल्याने परिचारीका महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी साक्षांकित केलेल्या निकालाच्या आधारे नोंदणी करण्यात आल्या आहेत.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वैद्यकीय महाविद्यालयांतील आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली तातडीने कार्यान्वित करण्याबाबत

**(५३) * १७९०१ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील १६ वैद्यकीय महाविद्यालयांतील आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (एचएमआयएस) गत सहा महिन्यांपासून बंद असल्याने या रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने राज्यातील १६ वैद्यकीय महाविद्यालयांतील आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली (एचएमआयएस) तातडीने कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) नाही.
(२) वैद्यकीय शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेदिक रुग्णालयांमध्ये अद्यायावत आज्ञावलींचा समावेश असलेली सर्वंकष Cloud Based एच.एम. आय.एस. २.० प्रणाली राबविण्यासंबंधी कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वाणगाव (ता.डहाणू, जि.पालघर) परिसरातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(५४) * १८४९१ श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.रामदास आंबटकर, श्री.रामराव पाटील :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाणगाव ते बोईसर (ता.डहाणू,जि.पालघर) रेल्वेमार्गाला समांतर आठ ते दहा किलोमीटर अंतराचा प्रवास रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे १८ ते २० किलोमीटरचा अंतराने करावा लागत असल्यामुळे नागरिकांच्या वेळेचा, इंधनाचा अपव्यय होऊन आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२)असल्यास, वाणगाव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील ग्रामीण रुग्णालयापासून मुंडवाळी मार्गे बोईसर अंतर केवळ आठ ते दहा किलोमीटर एवढे असून खडीच्या रस्त्यांमुळे नागरिकांना रुग्णालयात, बाजारहाट, रहदारीसाठी सुलभता यावी याकरीता रस्त्याच्या दुरवस्थेचे निराकरण करण्याची मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बोईसर, तारापूर औद्योगिक वसाहतींमधील कारखान्यांमध्ये वाणगाव परिसरातील आसनगाव, दाभले, विरे, गोवणे, साखरे, मोगरबाब या गावांतील मोठ्या प्रमाणात कामगार असून त्यांना रस्त्याच्या सोयीसह अन्य सुविधा शासन उपलब्ध करून देणार आहे काय,
(४) असल्यास, वाणगाव ते मुंडवाळी या खराब रस्त्याची दुरुस्ती केल्यास नागरिकांना बोईसरशी जोडणारा एक जवळचा रस्ता उपलब्ध होऊन त्याचा फायदा सामान्य नागरिक, कामगार तसेच या भागातून मोठ्या प्रमाणात केल्या जाणाऱ्या निर्यातक्षम मिरचीच्या बागायतदारांना होऊन गावांच्या विकासाला चालना मिळेल, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने सदर गावांतील रस्त्यांची दुरवस्था दूर करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन :** (१) होय.
(२) होय.
(३) बोईसर तारापुर औद्योगिक वसाहतीमध्ये वाणगांव व परिसरातून कामगारांना येण्यासाठी रा.मा.७५ मोगरबाब-मुंडावळी-बोईसर असा मार्ग अस्तित्वात आहे. तथापि, जवळचा मार्ग म्हणून कामगार वाणगांव-मुंडावळी-बोईसर हा रेल्वेला समांतर मार्ग वापरतात.
(४) व (५) वाणगांव-मुंडावळी-बोईसर या रस्त्यापैकी वाणगांव-मुंडावळी ही लांबी (४.७० कि.मी.) अवर्गीकृत असून सदरचा रस्ता खाजगी मालकीच्या जागेत असल्याने या लांबीत काम करणे शक्य नाही. सदर रस्त्यापैकी मुंडावळी ते बोईसर रस्ता हा इजिमा-६५ दर्जाचा आहे. रामा-७५ ते परनाळी ते बोईसर रस्ता हा वाणगांव-मुंडावळी या समांतर रस्त्यास प्रधानमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-३ अंतर्गत दर्जोन्नती करण्याच्या कामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील रूग्णालयांचे श्रेणीवर्धन करण्याबाबत

**(५५) * १८०४९ श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात आरोग्य व्यवस्थेच्या बाबतीत रूग्णालयाच्या संख्येच्या तुलनेत खाटाची संख्या कमी असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गडचिरोली जिल्हाची आकांक्षीत जिल्हा म्हणून ओळख असून सदर दुर्गम भागातील १ लाख लोकसंख्येकरीता १०३ खाटा उपलब्ध आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील रुग्णालयात लगतच्या चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यातून रेफर होत असल्यामुळे सदर रुग्णालय रुग्णांनी भरत असून १०० खाटांच्या या रुग्णालयात ३०० च्या आसपास रुग्ण दाखल होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर जिल्ह्यातील रुग्णालयातील खाटांचे श्रेणीवर्धन करुन सदर रूग्णालयाची स्थिती सुधारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

(२) नाही.

(३) अंशत: खरे आहे.

जिल्ह्यातील महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली हे १०० खाटांचे रुग्णालय कार्यान्वित असून जिल्ह्याच्या सिमेलगत असलेली नजीकच्या चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यातील रुग्ण सुध्दा संदर्भीत होत असतात. त्यामुळे जवळपास सरासरी महिन्याला १६० रुग्ण भरती होत असतात.

(४) महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली येथील रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता अतिरिक्त १०० खाटांचे बांधकाम राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत एकात्मिक विकास शाखेद्वारे (आयडीडब्ल्यु द्वारे) करण्यात येत असून बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी, २०१३ अन्वये ग्रामीण रुग्णालय, चामोर्शी, एटापल्ली व सिरोंचा यांचे व शासन निर्णय दिनांक ९ जून, २०१४ अन्वये ग्रामीण रुग्णालय, धानोराचे ५० खाटांचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन करण्यात आलेले आहे. कोविड आजाराचे नियंत्रणाकरीता उपाययोजना म्हणून जिल्हा स्तरावर १०० खाटांचे क्षेत्र रुग्णालय तयार करण्यात आलेले आहे. तसेच ४२ खाटांचे डीपीसीयु, ५० खाटांचे आयसीयु व उपजिल्हा रुग्णालय, अहेरी येथे २५ खाटांचे आयसीयु मंजूर असून कामे प्रगतीपथावर आहे. चामोर्शी येथे २० खाटांचे क्षेत्र रुग्णालय तयार करण्यात आलेले आहे.

जिल्हा रुग्णालय, गडचिरोली व अधिनस्त जिल्हा महिला व बाल रुग्णालय, गडचिरोली, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयातील उपलब्ध खाटांची संख्या एकूण १२१० आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील गावांमधील जल जीवन अंतर्गत योजनांची अंदाजपत्रके तयार करण्याबाबत

**(५६) * १७७५६ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यातील अनेक गावांत आजही पाणीपुरवठा योजना राबविण्यात आलेली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील जलजीवन मिशनच्या आराखड्यात ३५८ गावे आल्याने हिंगोली येथील गावागावात सदर योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हिंगोली जिल्ह्यातील गावांच्या पाणीपुरवठा योजनांची तातडीने अदांजपत्रके तयार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील :** (१) हे खरे नाही.

हिंगोली जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत एकूण ६५६ गावांमध्ये ६२८ योजनांची अंदाजपत्रके तयार करून सर्व योजनांचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आलेले असून, कामे प्रगतीपथावर आहेत.
(२) जल जीवन मिशनच्या आराखड्यात एकूण ६५६ गावांचा समावेश आहे, हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वाडी (ता.जि.नागपूर) येथे शासकीय रूग्णालय उभारण्याबाबत

**(५७) * १८४२४ श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती, नागपूर महामार्गावरील नगरपरिषद असलेल्या वाडी भागातील लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत असून ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र नगरपरिषदला हस्तांतरीत न झाल्याने तेथील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर भागात शासकीय रूग्णालय निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या भागात औद्योगिक वसाहत, कारखाने, ट्रान्सपोर्ट, तथा व्यावसायिक मोठ्या प्रमाणात असल्याने तेथील कामगारांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध होत नसल्याबाबत निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने वाडी येथील नागरिकांना आरोग्य सुविधा मिळण्याकरीता प्राथमिक आरोग्य केंद्र नगरपरिषदेला हस्तांतरीत करुन शासकीय रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावाला तातडीने मान्यता मिळावी यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) नाही, वाडी येथे उपकेंद्र सुरु असून त्याद्वारे रुग्णांना आवश्यक रुग्ण सुविधा पुरविण्यात येत आहे.

(४) सदर प्रकरणी मौजे वाडी येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय शासन निर्णय दिनांक ०७/११/२००९ अन्वये मंजूर करण्यात आले आहे. नवनिर्मित ग्रामीण रुग्णालयाचे बांधकामाकरीता रुपये २०७४.०० लक्ष इतक्या किंमतीचे अंदाजपत्रक व आराखडे दिनांक २२/०२/२०२३ च्या पत्रान्वये शासनास प्रस्ताव प्राप्त झाला आहे. परंतु सदर रुग्णालयाचे प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकाची किंमत रुपये १५.०० कोटी पेक्षा जास्त असल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उच्चाधिकार सचिव समितीकडे प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बालविवाह रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**(५८) * १७९११ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस, श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिदुर्गम भागात व खेड्यापाड्यात अजूनही बालविवाह होत असताना मुंबईसारख्या शहरातही बालविवाह होत आहेत, सदर बालविवाह रोखण्यात शासकीय यंत्रणेला अपयश आले असल्याची बाब दिनांक १८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात गत तीन वर्षात सुमारे १५ हजारांहून अधिक बालविवाह झाले असून त्यापैकी जेमतेम १० टक्के बालविवाह शासनाने रोखले असल्याची बाब निदर्शनास आली असून मुंबई शहरात केवळ एक आणि मुंबई उपनगरात केवळ पाच बालविवाह शासकीय यंत्रणेद्वारे रोखण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण भारतात बालविवाह प्रतिबंधक अधिनियम, २०२२ अन्वये अठरा वर्षांखालील मुलगी व एकवीस वर्षांखालील मुलगा यांना लग्नास बंदी असतानाही राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार भारतातील प्रगतीशील राज्य केरळच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात मोठ्या प्रमाणात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १३ जून, २०१३ तसेच १८ ऑगस्ट, २०१६ मधील अधिसूचनेनुसार ग्रामसेवक व बालविकास प्रकल्प अधिकारी यांची तसेच नागरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, बालविवाह रोखण्याकरीता मेळघाटासह अन्य आदिवासी भागांसाठी मा.न्यायालयाच्या आदेशानुसार तज्ञांची त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे काय, समितीच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे, तसेच प्रत्येक जिल्ह्यात स्थापन करण्यात आलेल्या जिल्हा बाल संरक्षण कक्षामार्फत बालविवाहाचे निर्मूलन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते काय, तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष, स्वयंसेवी संस्था आणि चाईल्ड लाईन यांच्या माध्यमातून बालविवाह रोखण्याबाबत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे स्वरुप व सद्य:स्थिती काय आहे,

(६) असल्यास, नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरोच्या अहवालानुसार पोलीस विभागाकडे गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे,
(७) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, त्यानुषंगाने मुंबई शहर व उपनगरासह राज्यातील इतर जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधक धोरण ठरवून अधिनियमाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी तसेच सदर प्रकरणी दोषी आढळणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपयायोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहरामध्ये १ व मुंबई उपनगरामध्ये ५ असे ६ बालविवाह रोखले आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

गेल्या तीन वर्षात सोळा आदिवासी जिल्ह्यात १८ वर्षाखालील मुली माता झाल्याची संख्या १५२५३ असल्याचे त्रिसदस्यीय समितीने सादर केलेल्या अहवालात आढळून आले आहे. तथापि, काही आदिवासी जमातीमध्ये काही रुढी परंपरा असल्याने त्यांचे बालविवाह झाले अथवा नाही याचा बोध होत नाही.

(३) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र राज्यासह संपूर्ण भारतात बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अन्वये अठरा वर्षाखालील मुलगी व एकवीस वर्षाखालील मुलगा यांना लग्नास बंदी असतानाही झालेल्या राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणानुसार भारतातील प्रगतिशील राज्य केरळ याच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात जास्त प्रमाणात बालविवाह होत असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

दिनांक ३ जून, २०१३ च्या अधिसूचनेन्वये राज्यातील प्रत्येक ग्राम पंचायती मधील ग्राम सेवकांना त्यांच्या ग्राम पंचायतीच्या क्षेत्रात बालविवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणुन नियुक्त करण्यात आले आहे. तसेच दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ च्या अधिसूचनेन्वये नागरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना आपआपल्या संबंधित प्रकल्प क्षेत्रावर अधिकारिता असणारे बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणुन नियुक्त केले आहे.

(५) मा.मुख्य सचिव व मा.ॲडव्होकेट जनरल यांचे निर्देशानुसार बालविवाहाचे सर्वेक्षण करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीकडून १६ आदिवासी जिल्ह्यातील बालविवाहाचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे.

प्रत्येक जिल्ह्यात बालविवाहाचे निर्मुलन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. तसेच जिल्हा बाल संरक्षण कक्ष, स्वयंसेवी संस्था व चाईल्ड लाईन यांच्यामार्फत पोस्टर वाटप, पथनाट्य, डिजिटल व्हॅन इ. स्वरुपात जनजागृती करण्यात येते.

(६) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार पोलीस विभागाकडे दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांमध्ये पोलीस विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार सन २०१९, २०२० व २०२१ मध्ये बालविवाह प्रतिबंध अधिनियम, २००६ अन्वये राज्यात दाखल करण्यात आलेल्या एकूण १५२ गुन्ह्यांपैकी १३७ गुन्ह्यांचे दोषारोप पत्र मा.न्यायालयात

दाखल झाले. त्यापैकी १३६ गुन्हे न्यायप्रविष्ट असून १ गुन्हा दोषमुक्त आहे. तसेच ३ गुन्ह्यांचा "ब" समरी अहवाल व २ गुन्ह्यांचा "क" समरी अहवाल न्यायालयात सादर करण्यात आला असून १० गुन्हे पोलीस तपासावर प्रलंबित आहेत.

(७) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरोच्या अहवालानुसार पोलीस विभागाकडे गुन्हे दाखल करण्यात आले असून पोलीस विभागाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुषंगाने बालविवाह होत असल्यास तो रोखणे, बालविवाह झाला असल्यास गुन्हे दाखल करणे, कायदेशीर कार्यवाही करणे अशी कार्यवाही करण्यात येत आहे. बालविवाह प्रतिबंध अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र बाल विवाह प्रतिबंध नियम, २०२२ प्रसिध्द करण्यात आले आहेत. बालविवाह प्रतिबंधासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

-----------------

## रोहा (जि.रायगड) शहरातील शासकीय तंत्र शिक्षण विद्यालयात पूर्णवेळ शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत

**(५९) * १७९५७ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) शहरातील शासकीय तंत्र विद्यालयात तंत्र शिक्षण देणारे पूर्णवेळ शिक्षक नसल्याने २४० विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुलांना रोजगाराभिमुख शिक्षण देणारे रोहा शासकीय तंत्र शिक्षण विद्यालय बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तंत्र शिक्षण विद्यालयात पूर्णवेळ शिक्षक नियुक्ती करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मंगलप्रभात लोढा :** (१) हे खरे नाही.

तथापि, शासकीय तंत्र विद्यालय, रोहा, जि.रायगड मध्ये निदेशकाची (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) २ पदे मंजूर असून, सद्य:स्थितीत सदर पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाकरीता तासिका तत्वावर एका निदेशकाची व प्रतिनियुक्तीने एका निदेशकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयांतर्गत शासकीय संस्था/ कार्यालयातील गट-क मधील ७७२ रिक्त पदे भरण्याकरीता संचालनालयामार्फत दिनांक १६/०२/२०२३ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर जाहिरातीमध्ये निदेशक (पूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम) या संवर्गाच्या ३१६ पदांचा समावेश आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्राथमिक आरोग्य केंद्र पातोंडा (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील आरोग्य अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(६०) * १८२१६ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सार्वजनिक आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढल्यामुळे पदे रिक्त झाली असून विविध जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकारी उपलब्ध होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बदल्यांमुळे पातोंडा (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांकरीता वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने आरोग्य विभागामार्फत झालेल्या बदलींमुळे रिक्त झालेली वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे तात्काळ भरण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ या अधिनियमानुसार महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा वैद्यकीय अधिकारी, गट-अ व गट-ब संवर्गाच्या बदल्या करण्यात येतात, परंतु सन २०२२ मध्ये वैद्यकीय अधिकारी यांच्या बदल्या करण्यात आलेल्या नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) प्राथमिक आरोग्य केंद्र पातोडा, ता.अमळनेर, जि.जळगाव येथे वैद्यकीय अधिकारी संवर्गाची दोन पदे मंजूर असून दोनही पदे भरलेली आहेत. सदर भरलेल्या २ पदांपैकी १ पदावर नियमित व १ पदावर कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून रूग्णांना आरोग्य सेवा पुरवित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध प्रकारच्या रोगांवर मात करण्यासाठी जीनोम सिक्वेसिंग प्रकल्प राबविण्याबाबत

**(६१) * १८३४० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेच्या (CSIR) प्रयोगशाळेने जीनोम सिक्वेन्सिंग प्रकल्प सन २०१९ मध्ये सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातून राज्यातील एक हजार लोकांचे व्होल जीनोम सिक्वेन्सिंग यशस्वीरित्या पूर्ण केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्राप्त माहितीनुसार देशातील सात कोटी लोकांमध्ये कॅन्सर जनुकीय असून लाखो लोकांचे जीनोम सिक्वेंसिंग केल्यास सर्व प्रकारच्या रोगांवर मात करण्यासाठी हा प्रकल्प वरदायी असून त्यानुषंगाने राज्यात जीनोम सिक्वेसिंग प्रकल्पाच्या माध्यमातून येत्या तीन वर्षात राज्य शासनाने किती लोकांचे जीनोम सिक्वेसिंग करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत :** (१), (२) व (३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक १९ एप्रिल, २०२१ च्या आदेशान्वये CSIR यांच्याशी महाराष्ट्र शासनाच्या वतीने DMER यांनी सामजस्य करार केला होता. या करारा अंतर्गत COVID SARS-COV-२ चे जीनोम सिक्वेसिंग करण्यात आले आहे. हे जीनोम सिक्वेसिंग विषाणंचे असून मानवाचे नाही व कॅन्सर जनुकीय अभ्यासाशी संबंधित नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.